

# श्री साईलीला

प्टेंबर

कि. ५० पैसे

१९७१

## या अंकांत—

१ श्री. बाळासाहेब रेगे यांची एक कामगिरी
२ श्रीसाईबाबांच्या उद्बोधक आठवणी
३ ईश्वरसाक्षित्वाच्या खुणा
४ संत नामदेवांची वात्सल्यभक्ति
५ मानवी मूल्यांचें महत्त्व
६ गीतेचें सारभूत मार्गदर्शन
७ ज्ञानदीप लावूं जगीं
८ श्रीरामकृष्णांचें अवतार रहस्य
९ शिरडीचें महात्म्य
१० शिरडीवृत्त



# श्री साई वाक्सुधा

भक्तांचा कल पाहून त्याची आवड लक्षांत घेऊन त्याप्रमाणें बाबा उपदेश करीत असत, व प्रत्येकाला योग्य मार्गास लावीत असत. कधीं कधीं एखाद्यावर रागावतही असत. एक दोन वेळां सांगूनही जो उमजत नसे त्याला भाषेचा दडगा दाखवूनही ते मार्गावर आणीत असत.

—श्रीसाईसच्चरित

---


## श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक. ]

वर्ष ४९ वें ] सप्टेंबर १९७० [ अंक ६ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४४३३६१

*

: कार्यालय :

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ,
प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४

## ❀ संपादकीय ❀

# श्री बाळासाहेब रेगे यांची एक कामगिरी

**प्रिय वाचक !**

श्रीसाईबाबांच्या सहवासात ८ । ९ वर्षे आलेले, त्यांच्या तालमीत तयार झालेले व त्यांचे तत्त्वज्ञान अंगी बाणलेले इंदूरचे सेवानिवृत्त न्यायाधीश श्री. बाळासाहेब रेगे यांच्या मुलाखतीचें सार गेल्या दोन अंकांत व याही अंकांतून प्रसिद्ध होत आहे. आम्हांला वाटते की श्रीसाईलीलेच्या वाचकांचे भाग्य थोर म्हणून तर आमचे प्रतिनिधी श्री. आप्पाराव यांच्याशी मोकळेपणी बोलण्याची त्यांना बुद्धी झाली. असें म्हणण्याचें कारण स्वतःसंबंधाने कमीत कमी किंवा मुळींच कांहीं बोलायचें नाहीं असा आदेश त्यांना बाबांकडून मिळालेला. त्यामुळे इतकीं वर्षे त्यानी जणू काय आपल्या तोंडाला कुलूप ठोकून ठेवलें होतें. परंतु मद्रास येथील अखिल भारतीय साई समाजाच्या साईभक्त व उत्साही कार्यकर्त्यांनी गेल्या ४।५ वर्षांपासून त्यांना बरोबर हेरून त्यांच्या भावभक्तीचा व ज्ञानाचा लाभ उठविण्याचे धोरण स्वीकारून सर्व साईभक्तांवर महदुपकार करून ठेवले आहेत.

मद्रास, आंध्र, तामीळनाडू वगैरे भागांत ज्यांच्या प्रभावी प्रचारामुळें साईभक्ति प्रचलित झाली, वाढीस लागली व फोफावली ते श्री. नरसिंहस्वामी श्री. बाळासाहेबांस फार मानीत असत. त्यांचे एकमेकाशी गुरुबंधूचे, जिव्हाळ्याचे नाते होते. त्यामुळे त्या भागांतील भक्तमंडळी श्री. बाळासाहेब रेगे यांचा शोध लागतांच त्यांना फार मानू लागली. बाळासाहेब रेगे यांनाही तो प्रचंड भक्तिभावाचा ओलावा पाहून आपण आतां स्तब्ध न रहाता बोलावें अशी प्रेरणा झाली असावी. कसेंही असो त्याचे अनुभव व आठवणी यांचा लाभ आपण घेऊं शकलों हें आपलें अहोभाग्य समजावयाचें.

श्री. बाळासाहेब रेगे यांनी ग्रंथरूपानें फारसें लेखन केलेलें नसलें तरी 'नारदीयभक्तिसूत्रावर' त्यानीं लिहिलेलें एक पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. त्याचा येथें परिचय करून देणें उचित वाटतें.

नारदीयभक्तिसूत्रांचे (संस्कृत) वाचन करीत असतां त्यांत नारद-मुनीनीं जी भक्तीची व्याख्या केली आहे ती श्री. रेगे यांच्या हृदयाला जाऊन भिडली. त्यांत त्यांना फार रस वाटूं लागला. हीं भक्ति-सूत्रें म्हणजे भक्तजनांच्या दृष्टीनें फार मोठा व अमोलिक ठेवा आहे असें त्यांना वाटू लागलें, सर्वसाधारण व संस्कृत न जाणणाऱ्या लोकांना हा ठेवा कसा उपलब्ध करून द्यावा याचा ते विचार करूं लागले. आपण नाहीं लेखक किंवा नाहीं कवी. मग हें कार्य कसे तडीस जावयाचें ?

माणसाच्या ठिकाणीं प्रबळ इच्छा असली म्हणजे त्या इच्छाशक्तीच्या बळावर भगवंतच त्याचा पाठिराखा होऊन त्याच्या हातून तें कार्य पार पाडून घेत असतो. तसेंच झालें असावें बाळासाहेबांचे !

मनाचा निर्धार करून ते नारदीयभक्तिसूत्रांचा आपण जो भावार्थ ग्रहण केला तो भक्तजनांना ओव्यांच्या स्वरूपांत कथन करावा, या विचारानें श्रीसाईबाबांचें पुण्यस्मरण करून ते लिहायला बसले. सुमारे दोनशें ओव्या लिहून झाल्या. त्या नंतर त्यांना आढळून आले की बाबांचे एक परम भक्त संत दासगणू महाराज यानीं यापूर्वींच नारदीयभक्तिसूत्रांचे आपल्या परीनें निरूपण केलें आहे.

ही गोष्ट ध्यानीं येतांच बाळासाहेबानीं सुरू केलेले कार्य तसेंच अर्ध्यावर सोडून दिलं. संत दासगणू यांच्यापेक्षां आपण अधिक काय लिहिणार असे कदाचित् त्यांना वाटलें असावे.

या घटनेला कांही काळ लोटला. बाळासाहेबांचा प्रयत्न अर्ध्यावरच पडून रहावा असा ईश्वरी संकेत नव्हता. तो प्रयत्न पूर्णत्वास यावा व त्यांनी केलेले रसाळ ओवीबद्ध निरूपण प्रकाशांत यावे असा ईश्वरी हेतू होता.

एकदां संत तुकडोजी महाराज व श्री. पं. श्रीधरशास्त्री पाठक यांची व

बाळासाहेबांची भेट होण्याचा सुयोग जुळून आला. सहज बोलतां बोलतां त्यांना समजले की बाळासाहेबानी नारदीयभक्तिसूत्रांचे ओवीबद्ध निरूपण करायला सुरुवात केली होती, परंतु तो आपला प्रयत्न त्यानीं अर्ध्यावरच स्थगित केला. त्यानीं तो भाग वाचून पाहिला व आत्यंतिक समाधान प्रगट करून तो परिपूर्णतेला आणण्याची बाळासाहेबांना आग्रहपूर्वक विनंती केली. एवढेंच नव्हे तर त्याप्रमाणे त्यांच्याकडून वचन घेतलें.

आतां उरलेला भक्तिसूत्रांवरील निरूपणाचा भाग पूर्ण केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. त्यांचा उत्साह द्विगुणित झाला व त्यानीं अर्ध्यावर सोडलेलें कार्य साईकृपेनें कांहीं वर्षांपूर्वी शेवटीं पूर्णत्वास आणिले.

नारदीय भक्तिसूत्रांचें निरूपण जेवढें करावें व व्हावें तेवढें थोडेच आहे. आमच्या माहितीप्रमाणें नारदीयभक्तिसूत्रांचें निरूपण श्री. विनोबा भावे यांचे बंधू श्री. शिवाजीराव यांनींही केलें आहे. आणि हा उपक्रम पुढेंही चालूच आहे. रत्नागिरी येथील भगवद्भक्त व या मासिकांत सध्या ज्यांची लेखमाला चालू आहे ते डॉ. रा. य. परांजपे यांनींही त्या भक्तिसूत्रांचें निरूपण करण्याचें मनावर घेतलें असून तें लौकरच प्रकाशांत येणार आहे.

शेवटीं थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे श्री. बाळासाहेब रेगे यानीं नारदीय भक्तिसूत्रांचें सुंदर ओवीबद्ध निरूपण करून भक्तिमार्गानें जाणाऱ्या मराठी जनतेवर फार मोठे उपकार करून ठेवले आहेत.

— संपादक

# श्रीसाईबाबांच्या उद्‌बोधक आठवणी

कथनकार — श्री. बाळासाहेब रेगे

लेखक : श्री आप्पाराव

(हप्ता तिसरा)

**श्रीसाईबाबांचे परमभक्त व प्रत्यक्ष त्यांचा सहवास अनेक वर्षे लाभलेले, इंदूर येथील सेवानिवृत्त न्यायाधीश श्री. बाळासाहेब रेगे हे मुंबईत आले असतां त्यांची भेट घेऊन, श्रीसाईबाबांसंबंधीं त्यानीं सांगितलेल्या आठवणी साईलीलेच्या जुलै व ऑगस्ट या दोन अंकांतून प्रसिद्ध करण्यांत आल्या. या अंकातून त्यांच्या आठवणींचा तिसरा हप्ता प्रसिद्ध करण्यांत येत आहे. या आठवणी फार आवडल्याबद्दल अनेक वाचकांकडून पत्रें आलीं आहेत.**

**—संपादक**

## हा बाळ माझा आहे !'

श्री. बाळासाहेब रेगे आपल्या मुलाखतींत पुढे म्हणाले, मला एक मुलगा झाला; तो दीड दोन वर्षांचा झाला असेल. त्याला शिरडीस बाबांच्या दर्शनास घेऊन जावे असें वाटले. त्याप्रमाणें आम्हीं उभयता शिरडीस गेलो. बाबांच्या दर्शनास जातांना त्या मुलासही बरोबर घेतले. बाबानीं त्याला उचलून घेतले व म्हणाले "हा माझा मुलगा आहे. मला देऊन टाक."

"तो तुमचा आहे तर तुम्हीं घ्या त्याला" असें मी ( श्री. रेगे ) सहज म्हणालो.

मग बाबा त्या बाळाला उद्देशून म्हणाले, "भाऊ ! असा आणखी किती दिवस खेळ खेळायचा ?"

नंतर आम्ही घरी आलो. आल्यानंतर सुमारे पंधरा दिवसांनीं मुलास ताप येऊ लागला. इंदूरमध्यें जे सुप्रसिद्ध डॉक्टर होते त्यांचा सहकार मिळवून

जे जे शक्य ते ते आम्हीं करीत होतो. आम्ही उभयता डोळ्यांत तेल घालून सतत जपत होतो. ७।८ दिवसांनंतर मुलाच्या बाबतीत धोका वाढू लागला आहे असे डॉक्टरांनी मत दिले तेव्हा तर आम्ही अधिकाधिक काळजी घेऊ लागलो. आम्ही दोघेही त्याच्या दोन बाजूस बसून एकसारखा पहारा करीत होतो. इतक्यांत आमचा डोळा लागला. थोड्या वेळाने पत्नीने मला हालवून जागे केले व म्हणाली, " बाळ कसं करतो आहे बघा ! "

त्याला शेवटची घरघर लागली होती. मला जागृती येऊन मी पहातो तर त्याची प्राणज्योत मालवली होती !

मोठा कठीण प्रसंग होता तो ! परंतु बाबांची आठवण करून त्याला धैर्याने तोंड देणें प्राप्त होते.

गादी घातलेली होती त्या भिंतीवर श्रीसाईबाबांची तसबीर लावलेली होती. बाळाला वर हळूच उचलला आणि त्यांच्यापुढे हात जोडले आणि म्हणालों "हा बाळ तुमचा होता ना ? घ्या आपला आणि त्याला सद्गति द्या, एवढंच मागणं !"

त्यानंतर २।३ महिन्यांचा काळ मार्गे पडला. बाबांच्या दर्शनाची इच्छा झाल्यावरून आम्हीं शिरडीस गेलो. आम्हांला आपल्याजवळ बसवून घेऊन त्यानीं परोपरीनें आमचें समाधान केलें. ते म्हणाले, " तें बाळ तुमचं नव्हतं, तें देवाचं होतं. देवानं त्याला आपल्या चरणाजवळ नेलं तर त्याबद्दल दुःख कां म्हणून करायचं !"

बाबांच्या शब्दावर आमची संपूर्ण श्रद्धा होती आणि शिवाय त्यानी तत्पूर्वींच्या भेटींत जरूर तो इषारा देऊन ठेवला होताच, त्यामुळं आमचा दुःखभार हलका होण्यास मदत झाली.

## लाल केळ्यांचे लोंगर

मी शिरडीत असता बाबांचा कोणी एक पारशी भक्त लाल रंगाच्या केळ्यांचे एक लोंगर घेऊन त्यांच्या दर्शनास आला. मी बाबांजवळ असलो म्हणजे हाताजवळ असलेल्या फळांतील चांगली फळें ते मला खायला देत असत. फळें कधी कधी स्वतः विकत घेऊनही ते सर्वांना वाटीत असत.

पारशी भक्त आले त्यावेळीं द्वारकामाईस असलेल्या कठड्याच्या बाहेरच्या अरुंद जागी मी बसलो होतो. बाबा आपल्या २–४ भक्तांसह आत बसले होते. लाल केळ्यांचे लोंगर पाहून व केळयांच्या लालबुंद साली पाहून माझ्या तोंडास पाणी सुटलें! आतां बाबा त्यांतील केळीं तोडून मला देतील असें मला वाटलें.

बाबानीं काय केलें? त्या लोंगरांतील एक केळें तोडलें आपल्या हातानें सोललें व आंतील केळ्याचे तुकडे करून ते जवळ बसलेल्या भक्तांस वाटले व साली बाहेर फेकल्या व त्या नेमक्या माझ्या अंगावर पडल्या! बाबांच्या हातच्या प्रसाद म्हणून मी त्या खाऊन टाकल्या.

पुन्हां बाबानीं दुसरें केळें सोललें तें भक्तांना वाटलें व साली पूर्वीप्रमाणें बाहेर फेकल्या आणि त्याही माझ्या अंगावर पडल्या! त्याही मी खाऊन टाकल्या!

कांहीं वेळ गेल्यानंतर बाबानीं मला आपल्याजवळ बोलावलें व आपला हात माझ्या गळ्याभोवतीं टाकून म्हणाले, "केळयाच्या साली तुला मिळाल्या त्या काय केल्यास?"

"खाऊन टाकल्या!"

"तूं त्या रंगदार सालींस भुलून गेला होतास नाहीं का? असं बाहेरच्या देखाव्यास कधींही भुलत जाऊ नये, अंतरंग शोधावें. महत्त्व आहे अंतरंगाचें.

असें बोलून बाबानीं एक केळे तोडलें, आपल्या हातानें सोलले आणि आंतील सबंध गर माझ्या तोंडांत कोंबला. पुन्हा एक केळे घेऊन ते सोलून आपण खाल्ले. खातां खातां ह्मणाले "लय गोड आहे नाहीं रे!". नंतर आणखी ही केळीं त्यानीं मला खायला दिलीं.

बाबा सहसा उपदेश करीत नसत. भक्ताच्या मनातील भावना ओळखून असाच कांहीं ना कांहीं प्रसंग साधून प्रत्यक्ष दाखल्यानें आपले बोधपर विचार दुसऱ्याच्या मनावर ठसवीत असत.

## एक अखेरचा प्रसंग

एकदां (१९१८) मी इंदुरांत असतां इन्फ्लुएंझा तापानें आजारी होतो त्या तापांतून मी नुकताच बरा होऊन बिछान्यावर बसूं लागलों होतों. एके

दिवशीं दुपारीं इंदूरमधील श्री. सरदार बुळे हे माझ्या घरीं आले. त्याना शिरडीस जाऊन साईबाबांचें दर्शन घेण्याची इच्छा झाली म्हणून ते माझ्याकडे आले होते. ते म्हणाले," मी शिरडीस जाऊं इच्छितों. मला तुमची सोबत हवी आहे; कृपा करून याल का ?"

मी माझी आजाराची अडचण सांगितली आणि म्हणालों," तुमच्या मनांत जायचं आलं आहे ना ? मग कोणाहीसाठीं थांबू नका. एकटे तर एकटे जा.'

परंतु त्यांना माझा हा विचार पसंत पडला नाही. ते म्हणाले, "तुमच्या बरोबर जाण्यांत मजा अहे, एकट्यानें जाण्यात कसली आली आहे मौज ? तुम्ही बरे होऊन बाहेर हिंडूं फिरूं लागला म्हणजे मग जाऊं या आपण."

अशा रीतीनें शिरडीस जाण्याचा आपला बेत त्यानीं पुढें ढकलला.

योगायोग कसा आहे पहा. त्यानंतर कांहीं दिवसांनीं काय घडलें तें सांगतो. माझ्या बिछान्याजवळच्या भिंतीवर साईबाबांची तसबीर टांगलेली होती. दोरा तुटून ती एकाएकीं बिछान्यावर पडली.

माझ्या छातीत धस्स झालें ! कांहीं तरी अशुभ घडलें असावें असें वाटून मनाला जबरदस्त चुटपूट लागून राहिली.

त्यानंतर शिरडीहून पत्र आलें तें मला बरेंच उशीरां मिळालें. ज्या दिवशीं व ज्यावेळीं बाबांची तसबीर तुटून बिछान्यावर पडली त्याच दिवशी व त्याच वेळीं बाबांचें या जगातील प्रत्यक्ष असें अवतार कार्य संपलें होतें.

जे एका ठायीं होते । ते सर्वांभूतीं झाले ।

या प्रसंगानंतर चाळिसाव्या दिवशीं आम्ही शिरडीस गेलों. द्वारकामाईंत नेहमी प्रमाणे बाबांच्या दर्शनास गेलों. बाबांची ती बैठक रिकामी होती. मला काय वाटलं आणि मी मनाचं समाधान कसं करून घेतलं हें वर्णन करून सांगण्याची आवश्यकता आहे असें वाटत नाहीं. बाबा आम्हांला सोडून जाणार कुठें ? जेथें जाल व जेथें जेथें पहाल तेथें तेथें बाबा आहेत !

## निरोप

श्री. बाळासाहेब रेगे यांच्या भेटीस त्यांच्या येथील या वेळच्या मुक्कामांत अधूनमधून आम्ही (आप्पाराव) जात होतों. ते ता.३० जून रोजी दुपारीं विमान-मार्गे इंदुरास जाणार असल्याचें आम्हाला आदल्या दिवशीं सायंकाळीं समजलें.

इंदुरास जाण्यापूर्वी त्यांची एकवार भेट घ्यायची असें मनाशीं ठरविलें होतें. त्याप्रमाणें ता. २९ जून रोजीं सायंकाळीं त्यांच्या भेटीस गेलों असतां त्यांचे नातलग व स्नेही त्यांच्या भेटीसाठीं विशेष मोठ्या प्रमाणांत येत जात असल्याचें पाहून श्री. बाळासाहेब हे इंदुरास जाणार असल्यामुळें त्यांना भेटण्यासाठीं मंडळीची दाटी झाली असावी, असें वाटलें.

परंतु नंतर समजलें कीं, त्या कारणाशिवाय आणखी दुसरेंही एक कारण होतें. तें कोणतें ? त्या दिवशी त्यांचा ८३ वा वाढदिवस होता. त्यांच्या आयुष्यांतील ब्यायशीं वर्षे मागें पडून त्या दिवशीं त्यानीं नव वर्षांत पदार्पण केलें होतें.

त्या निमित्त आमचें तोंड गोड करावें या हेतूनें त्यानीं आपल्या कन्येला हाक मारून आम्हाला कांहीं फराळाचे देण्यास सांगितलें.

खाद्य पदार्थांचा समाचार घेतां घेतां अभीष्ट चिंतनादाखल आम्हीं म्हणालों " आपण ८२ वर्षे पूर्ण करून ८३ व्या वर्षांत पदार्पण केल्याबद्दल स्वतःतर्फे व साईलीला वाचकातर्फे मी आपलें अभीष्ट चिंतन करतों. ब्यायशींच काय, परंतु श्रीसाईबाबांच्या कृपेनें शंभरी पूर्ण केलेली पहाण्याचे भाग्य आह्मांला लाभो, व असेच वारंवार भेटीगांठीचे, आपले अनुभव ऐकण्याचे सुप्रसंग अनेक येवोत."

यावर श्री. बाळासाहेब म्हणाले" बाबांच्या मनांत असेल तसें घडेल. १।२ वर्षांपूर्वी मद्रासेंत गेलो असतां तेथील साई समाजातर्फे जो एक समारंभ आयोजित करण्यांत आला होता त्यावेळीं वक्त्यांनीं मला सव्वाशें (१२५) वर्षांचे आयुष्य लाभावें अशी बाबांची प्रार्थना केली, तुमच्यापुढे त्यानीं मजल मारली ! मी तेथे उत्तरादाखल जें म्हणालों तेंच येथेंही म्हणतों. शंभर काय किंवा सव्वाशे वर्षे काय, अशी इच्छा प्रगट करण्याऐवजीं मी तुमचा चिरंतनचा सोबती व्हावें, जन्मोजन्मीं तुम्हीं आम्हीं भेटत रहावें, आमच्यांत अखंडत्व रहावे, अशी इच्छा आपण कां प्रगट करीत नाहीं ?

# ईश्वर साक्षित्वाच्या खुणा

निवेदक :- **चिपळूणकर गुरुजी**

( खूण चवथी )

मागील आठवणीप्रमाणे सन १९५७ च्या फाल्गुन शुद्ध नवमीस सुप्रभाती श्रीबाबांनी आदेश दिल्याप्रमाणे मी त्याच वर्षी श्रीरामनवमीस शिरडी येथें जाण्याचे निश्चित केले. त्याप्रमाणे तयारीस लागलो.

शके १८७९ चैत्र शुद्ध नवमी— श्रीराम नवमी— त्या वर्षी ८ एप्रिल १९५७ सोमवारी येत होती. मी शिरडीस जाण्यासाठी दि. ७ एप्रिल रोजी रात्रौ निघणे आवश्यक होते. शिरडी येथे जाण्यासाठी कोठून कसे जावयाचे वगैरे काहीही मला माहीत नव्हते. तरीही मी चौकशीस लागलो, शिरडीस जाण्यासाठी नागपूर एक्सप्रेसने मुंबईहून निघावे व अगदी पहिल्या डब्यांत बसावे. कारण तो संबंध डबाच काढून कोपरगाव येथे नेला जातो. तेथून टांग्याने शिरडीस जाता येते. अर्थात् याच मार्गाने परत यावयाचे. शिरडी येथे माझे कोणी परिचयाचेही नव्हते. परंतु श्रीबाबांचे आदेशाने एक एक व्यवस्था होत गेली. ती अशी :—

मी दि. ७ एप्रिल १९५७ रोजी शिरडीचे प्रस्थान ठेवले. ठरल्याप्रमाणे थोड्याशा गर्दीतून रेल्वेचे तिकीट तर मिळविले. रेल्वे-स्थानकावर मात्र उलट अनुभव आला, कारण लोकांनी म्हणजे बहुतेक शिरडी यात्रेकरूंनी, आपापल्या जागा आगाऊच रिझर्व्ह करून ठेवल्या होत्या. ती त्या डब्यांतील गर्दी पाहून मी अत्यंत सचिंत झालो. तेवढ्यांतच एकाएकी कोणीतरी अज्ञात- म्हणजेच मला ज्ञात नसलेल्या व्यक्तीने, माझ्या नावाने मला हांक मारली. त्या हाकेप्रमाणे आवाजाच्या अनुसंधानाने मी त्याही गर्दीतून गाडीत

प्रवेश मिळविला. मला ऐकू आलेल्या हाकेच्या रोखाने पाहिले असता एका खिडकी जवळील जागेत एक मध्यमवयीन पिंगट वर्णाची व्यक्ती मला दिसली. त्या व्यक्तीने मला सरळ सरळ प्रश्न केला की, "नाना, तुला शिरडीस जावयाचे आहे ना; मग येथे बैस. ही जागा तुझ्याकरिताच आहे. असे म्हणून, मी आत्ता येतो असे सांगून, मला आपल्या जागेवर स्थानापन्न करून ती व्यक्ती गर्दीत दिसेनाशी झाली. नंतर मी शेजारच्या गृहस्थांस प्रश्न केला की, " माझ्या पूर्वी येथे बसलेली व्यक्ती कोण होती व ती पुन्हा कशी आली नाही ? " शेजारच्या गृहस्थाने उत्तर दिले की, तुमच्या (माझ्या) जागेवर कोणीही बसलेले नव्हते, जागा रिकामी होती. कारण तेथे कोणी बसलेले आम्ही पाहिले नव्हते. आणि म्हणाले की, एवढ्या गर्दीत तुम्हाला फारच चांगली जागा मिळाली. ते गृहस्थ सहज बोलून गेले, परन्तु मी मात्र आश्चर्य चकीत झालो व विचार करू लागलो की, या जागी जर कोणीही बसले नव्हते तर मला गर्दीतूनही हाका मारून येथे बसवून जाणारी व्यक्ती कोण असावी ? उत्तर एवढेच मिळाले की, ईश्वराची लीला अगाध अहे. पुढे यथासांग प्रवास झाला व कोपरगांवहून सुखरूपपणे शिरडीस तर येऊन पोहोचलो.

शिरडीस माझे परिचित कोणीही नव्हते, तेव्हा राहाण्याची सोय नसली तरी तास - दोन तास धोतर - पंचाची पिशवी ठेवण्यास तरी आसरा हवाच असतो. मीही अशाच आसऱ्याचे शोधार्थ श्रीसाईसमाधिमंदिराच्या अवतीभवतीं हिंडत होतो, तोच संस्थेच्या कार्यालयाच्या दरवाज्यांत एक साधारण वृद्धसे गृहस्थ दिसले. या गृहस्थांना मी ओळखत होतो परन्तु वर्षा वर्षात भेट नसल्यामुळे विस्मरण झाले होते. तरीही स्मृतीला थोडा ताण देऊन मी त्यांना विचारले, की, "आपण इन्कम् टॅक्स कचेरीतील असून आपले नाव 'चौबळ' आहे काय ? यावर त्यांनी हसून मला सांगितले की, " अरे तू चिपळूणकर ना. तूं येणार हे मला माहीत होते. तुला काय पाहिजे ? एवढे ऑफिस येथे असतांना तुझी गैरसोय कशी होईल ? असे मला सांगून कचेरीतील एका सहाय्यकाकरवी माझी सर्व व्यवस्था लावून दिली.

यापुढे स्नान, पूजा अर्चा वगैरे आरतीसह यथासांग पार पडले. संस्थान-

तर्फे महाप्रसादाची व्यवस्था होती. त्यावेळीही हल्लीच्याच जागी भोजनगृह होते. भोजनाला नाममात्र शुल्क माझ्या स्मृतीप्रमाणे ८।१० आणे होते. नवलाची गोष्ट अशी की, त्यावेळी प्रसादाकरिता वेगळे शुल्क व वेगळी लाईन नव्हती. कारण सर्व लोकांच्या बरोबर भोजनप्रसाद घेत असतां स्वादिष्ट जिलब्यांचा ग्रहण केलेला प्रसाद आजही मला आठवतो आहे. आजचा थाट मात्र काही वेगळाच आहे. त्याचा अनुभव मी गतवर्षीच घेतला आहे. देवाच्या दारांतील महाप्रसादाबद्दल मला काही म्हणावयाचे नाही परंतु हल्लीची ठेकेदारी व्यवस्था मनाला जराशी खटकतेच. असो.

याप्रमाणे श्रीबाबांनी आदेश दिल्याप्रमाणे त्या राम-नवमीस माझी शिरडीयात्रा सुसंगत व अत्यंत सुखरूप अवस्थेत पार पडली. ज्यामार्गें गेलो त्याच मार्गें परत आलो. जातांना मन समाधीच्या दर्शनाकडे लागले होते तर परत येतांना पहिल्यापासून सर्व घटना दृष्टीसमोर येऊन मन बाबांचेच उद्गार आठवत होते की:—

**"मज जो गाई वाडे-कोडे**
**माझे चरित्र, माझे पवाडे**
**तयाच्या मी मागे-पुढे**
**चोहींकडे उभाच"**

# संत नामदेवांची वात्सल्यभक्ति

लेखक : द. शं. टिपणीस

[नामदेवाची भक्ति प्रेमभक्ति होती. पांडुरंगाच्या प्रेमानें तो आंतून बाहेरून न्हाऊन निघाला होता. अशा श्रेष्ठ भक्ताबद्दल व त्याच्या दैवताबद्दल सर्व साधारण संसारी जन काय समजतात व त्यांना काय वाटतें हें नामदेवाच्या आत्मचरित्रपर अभंगाच्या आधारें पुढील संवादात दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. जें मिळालें नाहीं कीं नातेवाईकांना दुःख होतें, ते नावें ठेवतात व जें मिळालें कीं त्यांना सर्व कांहीं पटतें, मान्य होतें, तें काय हें नामदेवानें आपल्या अभंगांत खुबीनें दर्शित केलें आहे. हें जें तें तेच घातक असतें व तेंच नामदेवानें टाळावें म्हणून त्याला व त्याच्या पांडुरंगाला कशी बोलणी खावी लागली हेंही या अभंगांतून नामदेवानें स्पष्टपणें सांगितलें आहे.] —संपादक.

नामदेवाची वात्सल्य भक्ति होती. लहान बालकाचें आईवर शुद्ध व पवित्र प्रेम असते तसे देवाच्या ठिकाणीं त्याचें प्रेम होते. लहान बालक आईशीं कांहींही बोलते, हट्ट घेतें. ही आई मोठी, रागावेल अशी भीति नसते त्याला. सर्वस्व म्हणजे आई. त्याची ओढ आईकडे रागवायचें तें आईवर. हट्ट करावयाचा तो आईपाशीं. आई बोलली नाहीं तर तिची हनुवटी धरून लाडिकपणें ‘ बोल ना बोल ना ’ म्हणून लाडिक हट्ट घेऊन बसेल. गंमत म्हणून आई मुद्दाम एकाद वेळीं बोलत नाही. पण मनांत आनंद होतो तिला वात्सल्याच्या गुदगुल्या होतात तिला. एकदम त्याला जवळ घेऊन त्याचा लाडिक हट्ट ती पुरवते. विठू व नामा यांचे असेच होते. असेच प्रेम व वात्सल्य.

नामदेवाला कौतुक विठोबाचे, ओढा त्याच्याकडे, हट्ट करायचा तो त्याच्या पाशीं नामा देवापाशीं लाडिकपणें बोलायचा, खेळायचा, आई बालकाला भरवते. बालक घास न घेता आई तूच खा म्हणून हट्ट धरते. आईनें घास खाल्ल्याशिवाय त्याचें समाधान होत नाहीं. बालकाचे प्रेम त्याच्या आईला बालहट्ट पुरा करायला भाग पाडते. अगदी असाच हट्ट नामदेवानें देवाकडे धरला. एक दिवस तो

देवळांत गेला व देवापाशीं हट्ट धरून बसला कीं देवा या जेवा व माझ्या हातचा घास घ्या. नामदेव देवाला सांगतात "देवा पांडुरंगा तुम्ही या. रुक्मिणी आई तुम्ही या येताना सर्व सामुग्री घेऊन या. माझें काय आहे ? तर मी तुम्हाला जेवायला देऊं ? तुमचे तुम्ही जेवा, माझ काम फक्त सडासंमार्जन करणें, उष्ट्या पत्रावळी काढणें, सेवा माझी, बाकी तुमचे. तर सगळे घेऊन या जेवा व उच्छिष्ट प्रसाद म्हणून द्या." नामदेवानें देवाची खूप आळवणी केली. माउलीला बालकाचा हट्ट पूर्ण करावा लागला. पांडुरंग प्रकट झाला. जेवला व प्रसाद नाम्याला मिळाला. पांडुरंगाचें दर्शन झाले. नामदेवाला समाधी लागली. पांडुरंगानें त्याच्यावर वरद हस्त ठेवला. देवळांत हा प्रचार चालू होता—

## नामा बेपत्ता झाला !

घरी नामदेवाची आई त्याची वाट पाहत होती. भोजनाची वेळ झाली, होऊन गेली तरी नाम्या आला नाहीं म्हणून आई चिंता करीत होती नाम्या आला नाहीं म्हणून त्या माउलीने घास घेतला नाहीं. आतां येईल मग येईल अशी आशा करीत वाट पहात होती ती. माझ्या नाम्याचें मन विठ्ठलांत गुंतले आहे. भूक तान्हेचेही त्याला भान नसते. तो विठ्ठलांत रंगून जातो. विठोबानें त्याला पक्का भुलवला व हा भुलला. पांडुरंगाला भुलून बसला असेल डुलत कुठेतरी देवळांत. पण आईची कांहीं काळजी ? वाट पाहून पाहून थकले, क्षुधाक्रांत झाले तरी नाम्याचा पत्ता नाहीं. उठली बिचारी व देवळांत गेली. पहाते तर समोरच पांडुरंग व नाम्या मोठ्या आनंदांत डुल्लत आहेत. हाच तो. यानेंच माझ्या नाम्याला भुलविले व नादी लावले. माझा मुलगा वाया गेला तो याच्याच नादानें. आईला क्रोध आला. यानेंच माझ्या मुलाला संसारांतून उठविले. कां केलेस असं ? रागारागानें तिनें पांडुरंगाचा हात हिसडला. पांडुरंगाची आईनें केलेली विटंबना नाम्याला पहावेना. तो बेशुद्ध झाला. तो पडलेला पाहून आईचा राग गेला. मातृवात्सल्य धावून आले. आईनें त्याला मांडीवर घेतलें. कांहीं वेळानें नामदेव शुद्धीवर आला. आई व इतर नातेवाईक समोर. पण विठोबा कुठें ? इकडे तिकडे पाहूं लागला. विठोबाच्या नादी लागल्याबद्दल, संसार व धंदा यांकडे दुर्लक्ष केल्याबद्दल नातेवाईक त्याची खरडपट्टी काढूं लागले. आई परोपरीनें घरीं चलण्याविषयीं विनवूं लागली तेव्हां –

## नामदेव व आई

नामदेवः— कां बोलतां माझ्या पांडुरंगाला. शस्त्राशिवाय वध केलात माझा तुम्हीं. दुर्वचनाच्या जखमा झाल्यात या जीवाला. जीव तळमळतो आहे. माझ्या पांडुरंगाला कां ताडन करता ? आई, तुझ्यामुळे मला केशव अंतरला. मी नाहीं येत. तू जा घरीं. मला इथेंच पांडुरंगाकडे राहूं दे. त्याच्या स्वाधीन मला कर आणि जा तूं.

आई :— नाम्या घरीं चल, असा रुसूं नकोस. अरे, तुझा केशव काय येईल पुन्हां तुला शोधीत. दुसरा काय उद्योग आहे त्याला ? तुझ्यासारख्यांना शोधत फिरत असतो. पोरांना नादी लावावयाचे. अशी कैक पोरे बिघडवली तुझ्या त्या विठोबानें. अरे देवाशी खेळायला तू येतोस खेळतां खेळतां त्यानें तुला भूल घातली. तुझे हें जगणें लाजिरवाणें आहे. देवांचें वेड टाकून दे. लोक हंसतात कांहीं कामधंदा शीक. घरांत लक्ष घाल व घराण्याची लाज राख. लोकांची मुलें पहा बरं. काम धंदा करतात, संसारात लक्ष घालतात. आणि तूं ? कुलक्षय करायला निघालास. कांहीं पराक्रम कर. नुसता भूभार कशाला होतोस ? लाजलज्जा सोडून सभामंडपात जातोस काय आणि नाचतोस काय ? नुसता अज्ञानी ठोंब्या आहेस, आई-वडिलांना विसरणारा तूं. तुला पुत्र म्हणायची सुद्धा लाज वाटते. पुत्र कलत्र ही घराची संपत्ती. पण चित्तीं काय ? तर पांडुरंग तोच तुला सर्वस्व. घरबुडव्या देव तो आणि त्याची भक्ति करतोय ? त्याच्या नादीं लागून कैक बुडाले. विठ्ठलाच्या नादानें तूं घर बुडवायला निघालास. अरे, अशानें काय भले होणार ? बरी नाहीं या विठ्ठलाची संगती. त्याच्या नादानें संसार जळतात व भिकेचा कटोरा हातीं येतो. सोड त्याची संगत नाम्या. बाळा भूक लागली असेल रे तुला, चल घरी चांगलं खाउं घालते.

## वडिलांचा उपदेश

दामू शेटीः—नाम्या, आई काय म्हणते तें ऐक. देवाच्या नादी लागून कोणाचें बरें झालें आहे ? काम धंदा शिक. कुलाचार ( शिंपी धंदा ) राख. मी आतां थकलो वृद्ध झालो. आतां पुढें घर चालविणारा तूंच. तूंच असे केलेस तर मग आम्ही कोणाकडे बघावे ? असा कसा रे तू निर्बुद्ध. किती सांगितले तरी कळत नाहीं चल पाहूं घरी. मी शिकवीन तुला चार गोष्टी.

नाम्याः--आई, सांगतो तें ऐक. आवंढ्या नागनाथाच्या दर्शनाला गेलो होतो. पांडुरंग भेटला. या देहांत त्याचा संचार झाला तेव्हांपासून तुझा माझा संबंध संपला व पांडुरंगाचा संबंध जडला, त्याचाच छंद लागला मला. देहाचे भान नाही की व्यवहार समजत नाहीं. मला टाळ घेऊन सभामंडपात नाचावे गावें यातच आई लई आनंद वाटतो बघ. काय सांगू त्याची गोडी ? केवढे अपरंपार सुख वाटतें मला. नाहीं कळायचे तें तुला. अमृत चाखले मी मग आई सांग या जिभेला खारट तिखट संसाराची काय चव लागणार ! कंटाळलो या संसाराला. पुरा विटलो व गोपाळाला शरण गेलो. पुत्र व कलत्र यांच्या संगतीनें अधःपात होतो. आई, संसार तुला सुखाचा वाटतो, सत्य वाटतो. पण मला तो विष वाटतो. म्हणून टाकून दिला. जें विष टाकलें तें पुन्हां सेवावयाचें काय ? पुत्र, कलत्र ही सत्संग नव्हे. म्हणून संतांची संगत धरली, विठोबाला शरण गेलो. आतां संसाराबद्दल उगाच कां मला सांगत बसतेस.

## विठूची प्रार्थना

आईने पाहिले कीं नाम्याला कांही सांगण्यांत अर्थ नाही. तो बिघडला. विठोबाने त्याला बिघडविला. त्याच्या विठोबालाच सांगून पाहू. तोच नाम्याला कांही सुबुद्धि देईल तर देईल. म्हणून नाम्याची आई विठोबाला म्हणते.

आई :--बा, विठोबा, अरे कांही तरी माझ्याकडे लक्ष दे. उतारवयांतील माणसे आम्ही. पण नाम्याला कांही ते कळत नाही. तो कसा वागतो ते पहा जरा. चार चांगल्या गोष्टी सांग की त्याला माझा बाळ मला परत दे. तूं पंढरीनाथ कृपाळू असे म्हणतात. पण आतां कळले तुझें खरे रूप, तुझा देवपणा, अरे, तुझी सगळी करणी ठाऊक आहे मला. पण ती बोलून पदरीं कशाला हलकेपणा घेऊं. घरबुडव्या तूं. पुंडलीकाने तुला पुरता ओळखला. म्हणूनच त्यानें तुला बसायला सांगितलें नाहीं. कोणाला तूं जाळ्यांत पकडूं नये म्हणून कमरेवर हात ठेवावयास लावून त्यानें तुला ठणठणींत उभा केला. पोरांसोरां करवी आपला डांगोरा उगाच पिटीत असतोस.

पंढरिराया, तुला कसं समजत नाहीं. आम्ही शिंपी, गरीब, अनाथ, शिंपी काम करून पोट भरतो. नाम्यानें काम करून या वयांत आम्हाला चार

घास घालावयाचे नाहीं तर कोणी ? आमचा धंदा बुडवलास आणि तोंडचा घास काढलास. देव म्हणवतोस. शोभते का हें तुला. तूं अगदींच मित्रा नि दुर्बल दिसतोस. एवढें चराचर असतां दुर्बलांच्या पाठीशी कां लागतोस ? नाम्या-शिवाय तुला कोणी दुसरा भुलवायला मिळाला नाहीं का ? गरीब म्हणून तूं आमच्या मागे लागलास ना ? मी पहाते, श्रीमंतांच्या वाटेला तूं जात नाहींस. बोल. किती श्रीमंतांची पोरें तूं नादी लावलीस ? मित्रा, गरीबांना मात्र भिकेला लावतोस. आणि तुला म्हणतात गरीबांचा वाली. छान न्याय. जगाची माउली तुला म्हणतात ना ? मग तुला आईचें हृदय कसे कळत नाहीं ? दीनांचा कैवारी श्रीहरी तू कांहीं ब्रीद राखशील कीं नाहीं आपलं ? केशिराजा, पदर पसरते तुझ्यापुढें. उदार हो, थोर हो व नाम्याला माझ्या स्वाधीन कर. शरण येईन तुझ्या चरणीं.

### मी त्याची माउली !

विठ्ठलः—आई का उगाच मला बोल लावतेस ? तुझ्या नाम्याने मला त्याचें चित्त अर्पण केलें व मला आपलेसे केलें मी त्याचा आप्त झालो. माता, पिता, बंधु, भगिनी सर्व कांही मीच असें त्याचें मन झाले. नाम्याची ही करणी तुला ठाऊक नाही आणि मला दूषण देतेस. मी चाळविलें कां तुझें बाळ ? त्यानेच स्वःतला चाळविले. त्यानें आपल्या प्रेमानें बांधून टाकले मला. त्याला मी काय करू ? प्रेम दिले तर ते घेणें हे माझे ब्रीद आहे. प्रेमापोटी तो धावत येतो व मी त्याला प्रेमानें पोटाशी धरतो. तूं आई आहेस. मातेचे हृदय जाणतेस. माझेही हृदय तसेंच आहे. मी माउली आहे. मला अशी भक्ताची निष्ठा आहे. अशी निष्ठा जेथें आहे तेथें मला माउली होणें भाग पडते. माउली अशी हाक ऐकू आली व पुढें होऊन मी माझ्या बाळाला कडेवर घेतले तर तो काय माझा दोष होईल ? नाम्यानें सर्व जीवन मला वाहून टाकलय. रात्रंदिवस त्याला माझा ध्यास. माझ्यावर त्याचे सदैव लक्ष. त्याचे देहभानच हरपले आहे. मग सांग बरं त्याचे संसाराकडे कसे लक्ष लागावे ?

आईः—देवा, उगाच गोड बोलून भुलवूं नकोस मला. भान हरपवले तूंच. तुझ्या नामाच्या भजनाचा हा सारा परिणाम. देवा, आजपर्यंत तूं कोणाचे भले तरी केले आहेस कां रे ? मयूरध्वज राजास करवतीनें कापलेस. दानशूर बळीला पाताळांत चेपलेस. प्रल्हादाच्या बापाला पोट चिरून ठार मारलेस. ध्रुव

बाळाला स्थिर करून त्याचे जाणे येणे खुंटवून टाकलेस. हनुमंत एवढा मोठा भक्त पण तूं त्याला माकडाचे रुप दिलेस. श्रियाळ राजा तुझा भला भक्त पण तूं त्याच्या मुलाला कांडून खाल्लेस. आणि आतां माझ्या बाळाला भुलवून संसार बुडविलास. अशी ही तुझी करणी. पण तुला सांगून काय समजणार ? जा. नाम्या तुला देवून टाकला. आतां तरी झाली तुझी समाधानी. येते. पाया पडते.

## खऱ्या सुखाची गोडी

विठोबाला बोललेलें नाम्याला रुचलें नाही. तो आईला सांगतो :— आई, खरे सुख तूं चाखले नाहीस. त्याची गोडी कशी कळणार तुला ? माझी वृत्ति स्वीकार म्हणजे कळेल तुला विठोबाच्या संगतींत काय सुख आहे तें. आई, एक सांगतो. अगदीं सत्य. तें सुख तूं एकदां चाखलेस कीं या संसारसुखाकडे बघणारच नाहींस. वीट येईल संसाराचा तुला. असाच वीट आला मला. संसाराला त्रासलो. जन्म मरणाला कंटाळलो. विठोबाला शरण गेलो. पण तुम्ही मला मार्गे खेचतां. कशासाठीं ? तर स्वार्थासाठीं. तुमचा लोभ पुरवावा म्हणून, मीं हवाहवासा वाटतो तुम्हांला. बायको, पुत्र, सर्व नातेवाईक केवळ स्वतःच्या लाभासाठीं माझ्यावर लोभ करतात, ममता करतात. त्यांचेच कल्याण त्यांना करतां येत नाहीं आणि माझ्या कल्याणाच्या गोष्टी मला शिकवितां, सुखांत सगळेच वाटे मागायला येतात. दुःखाचा थोडासाही वाटा घ्यायला कोणी तयार नाहीं. पळून जातात सगळे. माझा पांडुरंग तसा नाही. सुख दुःखात भागीदारी करतो. माझी जातपात पुसली नाहीं त्यानें. मला आपला म्हटला. माझा शब्द ऐकून धावत येतो. मला काय हवें नको तें त्याला न सांगताच समजते. संकटांत अभय देतो. दुःखांत कुरवाळतो. छाया करतो माझ्यावर आपल्या पीतांबराची. तोच माझा माता पिता. सखा सोयरा. माझा असा तोच एक. आई, माझ्या ठिकाणचे तुझें ममत्व पांडुरंग चरणीं ठेव. दीनांची गरीबांची लाज राखणारा तो कृपासिंधू तुला कधीं विसरणार नाहीं. पीतांबरासह पाण्यांत उडी घेऊन गजेंद्राला त्यानेंच सोडविले. प्रल्हादाचे त्यानेंच रक्षण केलें. पांडवांची लाज त्यानेंच राखली. त्याला अनन्य शरण जा. मी ही असेंच केलें. त्यानेंच मला वासनांच्या पाशांतून मुक्त केलें. आई, तूं ही तसेंच करना म्हणजे तो तुलाही दुःखांतून मुक्त करील.

## संतापुढे गाऱ्हाणें

आई समजली कीं नाम्याला सांगण्यांत अर्थ नाहीं. आणि पांडुरंग तर काय ? कमरेवर हात ठेऊन उभा आपला अलिप्त. त्यापेक्षां ज्ञानदेवादि संताना गळ घालावी. दोघेही त्यांचें ऐकतात. सांगतील ते नाम्याला चार उपदेशाच्या गोष्टी व येईल नाम्या ताळ्यावर. ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई आदि संत घरीं आले असतां तिनें आपलें गाऱ्हाणें त्याना सांगितले. संत म्हणाले, "गोणाई, धन्य तूं हें रत्न प्रसवलीस. धन्य तुझा कुसवा. धन्य तुझा वंश. धन्य तुझें कुल. कीं हा प्रकाशदीप तुझ्या कुलांत जन्मला. त्याला अंगाखांद्यावर खेळवलेंस. धन्य तूं प्रत्यक्ष पांडुरंग तुझ्या अंगाखांद्यावर खेळला. कुलाची कीर्ति अमर करणार हा अमृत कलश तुझ्या घरांत आला. पांडुरंगाचें लाडके बाळ ते. तो आम्हाला भेटला तर भाग्य समजतो आम्ही आमचे. लोककल्याणाचा दीप तो. तो तुमच्या घरांत कां प्रकाश आणणार नाही ? उगाच चिंता कां करतेस ?"

## पत्नीची विनवणी

या नंतर नामदेवाची बायको राजाई हिनें त्याला पुष्कळ सांगून पाहिले. ती विनविते, " अहो, आई सांगते तें ऐकत कां नाही ? आई काय वाईट सांगते ? कांहीं लोकलज्जा तरी धरा. लंगोटी लावून सर्वस्वाचा त्याग करून गोसावी झालांत. आता आमची काळजी कोण घेणार ? तुमची ही स्थिती पाहून कीव वाटते मला. तुम्ही स्वतःला वेड लावून घेतलय. मोह, माया, ममता सर्व सोडलीत. कोणी भुलविले तुम्हाला ? संसाराचें बारा करून फार मोठे नांव कमावलेत तुम्ही ! वेडे पिसे झालांत तुम्ही. आता घर सांभाळायचे कोणी ? नि चालवायचे कसें ? सर्व सोडून देव धरलात. पण त्यानें संसारच पुसून टाकला. घर धन्यानें गुरु केला. मंत्र घेतला, घरांत संतांचा सुळसुळाट झाला. ते सगळेच पिसाट वेडसर, एकमेकांच्या पाया काय पडतात. गातात काय नि नाचतात काय ! सासुबाई भोळी म्हणून हें चालते घरांत. आता करू काय मी? मेसाई, आई धावग, रक्षण कर आमचें व हे सारे नाहीसे कर. " नामदेवानें याकडे कांहींच लक्ष दिले नाही. शेवटी राजाई रुक्मिणी मातेला विनवते. " रखुमाबाई, तुम्ही स्त्री. स्त्रीचे अंतःकरण व व्यथा जाणता. विठोबाला विचारा की माझ्या भ्रताराला कां असे वेडे केले. आई, खायला नाही, प्यायला नाही, की ल्यायला वस्त्र नाही.

घरांत १४ माणसे. काय करावे त्यांनीं. अन्नासाठी दारोदार हिंडतात. पांडुरंगाला सांगा की दयेची दृष्टि टाका आमच्याकडे. भ्रताराला शहाणा करा. यांनी आमची पाठ पुरविली. संसाराची वाट लावली. रखुमाबाई काय करावे आम्ही ? कोणाच्या सावलीला बसावे ? त्यांना आमची करुणा येत नाही. रात्रंदिन सारखं गोविंदु गोविंदु करीत असतात. सारखं पांडुरंगाचं चिंतन पण आमची चिंता नाही. तुमच्या संगतीनें आम्ही हीनदीन झालो. जाणतेस तूं हे, रखमामाते."

## केशव भटजीच्या रूपाने दर्शन

कांही दिवसांनी पांडुरंग केशव भटजीच्या रूपाने नामदेवाच्या घरी आले. भटजींनी नामदेवाच्या कुटुंबाला विपुल धन धान्य दिले. आणखी लागले तर माग. देईन असे आश्वासन दिले. पांडुरंगाचा हा उदारपणा पाहून राजाई स्तंभित झाली. केशवभटजीच्या रूपांत कां होईना तिला पांडुरंगाचे दर्शन झाले. त्या दर्शनाने ती मोहित झाली. देवाच्या चरणी लागली. पांडुरंगाचे विशाल हृदय तिला पटले. त्यानंतर राजाई नामदेवाला सांगते, "मी अज्ञानी, तुमच्या स्वामीचा महिमा मला कळला. नाहीं. त्या कृपाळू पांडुरंगानें येऊन खुशाली पुसली, घर समृद्ध केलें. किती मोठा, किती उदार हो पांडुरंग ! किती कनवाळू आणि मायाळू. मला वेडीला हें कांहीं कळलें नाहीं. मी वाटेल तशी बोलले. क्षमा करा मला. आईवडिलांनी देवब्राह्मणा समक्ष मला तुम्हाला दिलें. मी तुमची दासी, तुम्ही माझें स्वामी. स्वामीच्या स्वामीला मी टाकून बोलले. रागावूं नका. पदरांत घ्या मला. तुमचें ऋण किती म्हणून सांगू. तुमच्यामुळें तो पांडुरंग दिसला. त्याचें मुख पाहून भानच हरपलें माझें. तुमची अर्धांगी होऊन धन्य झालें मी. जें तुम्ही धरलेत, ज्या योगे तुमचें चित्त सुखावते, आनंदते, ज्या योगे ऐहिक तृष्णा नाहीशीं होतें तें तुमच्या हृदयांतील गुह्य बीज मला सांगा. शरण आहे तुमच्या चरणीं. आतां मला पांडुरंगाच्या पायीं घाला."

# मानवी मूल्यांचें महत्व

( लेखक : द. दे. अंबेकर )

भारतीय अध्यात्माचा गाभा, परमेश्वरी साक्षात्काराची साक्षात् मूर्ती, मानवी मूल्यांच्या रत्नभांडारांचा साठा साठवलेल्या रामायण महाभारत यासारखे ग्रंथ, अपौरुषेय वेद, साक्षात् भगवंताने अवताररूपाने कथन केलेली गीता, मानवी उन्नतीचे अंतिम शिखर, मानवी जन्माचा उद्देश तदनुसार त्याचें साफल्य ती कशा प्रकारे साधता येतील, दुर्बलास सबल कसें बनविता येईल, त्याची इष्टानिष्टता एकूण मानवी उन्नतीला पोषक ठरेल, त्याच्या सर्वांगीण उन्नतीसाठी परिपूर्ण असा आचारविचार त्याचा साक्षात्कार याचा उगम ज्या भूमीवर झाला जिथे परमेश्वराने मानवी अवताररूपाने रामायण महाभारत आदींच्या रूपाने मानवी मूल्यांचे रत्नभांडार, गंगा, यमुना, गोदेप्रमाणेच मानवी कल्याणासाठी खुले करून दिले. त्याच भूमीवर आज आपण जो मानवी देह अनंत जन्माच्या फेऱ्यानंतर जखडून टाकलेल्या आत्म्यास मुक्त करण्याचे हेतूनें नियतीने दिला आहे त्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. त्याचे वर्णन किती करावे ? मानवी मूल्यांचे रत्नभांडार आपल्या स्वाधीन करणाऱ्या या जगच्चालकाचे जन्मापासून अंतापर्यंत आपल्या रोमरोमामध्ये चिंतन चालू ठेवणें हें आपले आद्य कर्तव्य आहे आणि तोही एक प्रकारचा उच्च स्वार्थच आहे. सबल दुर्बल ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणें. मग तो योगमार्ग असो कीं साध्या नामस्मरणाचा धोपट मार्ग असो कोणताही धर्म असो, राम असो, रहीम असो, ख्रिश्चन असो, ब्राह्मण असो अथवा शूद्र असो, राव असो, रंक असो, जेथें आपपर भाव नाहीं, भावभक्ती आणि प्रेम, शुद्ध अंतःकरण, पावित्र्य व मांगल्य, सर्वांभूतीं परमेश्वर हा भाव, ही वृत्ती अंतःकरणांत, ठसवली तर मानवाला त्याचे

ध्येय गाठणे कांहींच कठीण नाही. परंतु ही जी गोष्ट सकृद्दर्शनी सहज साध्य दिसते तशी ती नाहीं. मोठमोठ्या साधुसंतांनीं देखील ही मानवरूपी नाव पैल-तीराला नेण्यासाठी परमेश्वराजवळ आर्त हांक मारली आहे. मग सामान्यांची काय कथा ?

मानवी मूल्यांचे महत्व ओळखून त्यांना जीवनात स्थान देता येईल. त्याप्रमाणे आचरणही करता येईल; परंतु परमेश्वर-चिंतनाचा इतकेच नव्हे तर त्याचा ठसा अंतःकरणात दृढ करण्याचा संबंध काय ? जिथे मुळांतच ईश्वराचे अस्तित्वाबद्दल शंका,तिथे निसर्गाने दिलेल्या देहाचा एका अदृश्य शक्तीला कल्पून निरर्थक व्यय करणे या सारखा खुळेपणा तो कोणता ? सध्याचे विज्ञानयुगात ज्या ठिकाणी माणूस चंद्रावर पोचतो, अंतराळावर स्वामित्व गाजविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगतो, या जगात दिसणाऱ्या अनंत गूढ शक्तींचा उकल करण्याचा प्रयत्न का करू नये ? जगात ज्या ज्या गोष्टी अद्‌भुत असतील त्यासाठी मान-वाने कसोशीने प्रयत्न करावयासच पाहिजेत. डॉ. राधाकृष्ण यानी म्हटल्याप्रमाणे मानवाने अंतराळाचा वेध अवश्य घ्यावा पण त्याचबरोबर पहिल्या प्रथम जमिनीवर स्थिर उभे राहावयास शिकलें पाहिजे. अंतर्मन हें देखील एक गूढच आहे. त्यापासून आत्म्याचा परिचय आधुनिक संशोधकाप्रमाणेच ज्यानी शोध लावून प्रत्यक्षात अनुभवाची सांगड घातली आहे त्याचा आपल्या देहाशी अन्नपाण्याइतकाच निकटचा संबंध आहे म्हणूनच आधुनिक युगांतही विवेका-नंदांनी पाश्चात्यानाही आकर्षून घेतले.

कोणी असे म्हणेल की प्रत्यक्षात हा सूर्य व हा जयद्रथ दाखवा, भूक लागली असताना भूक या वस्तूचे दर्शन घडणे कसे शक्य आहे ? ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल शंका घेणाऱ्याना दोष देता येणार नाही. विवेकानंद प्रथम निरीश्वरवादीच होते. मानवी मूल्यांचें महत्व ज्याप्रमाणे मानवी जीवनाला पोषक आहे त्याचप्रमाणे आत्मदर्शन हे देखील मानवी उन्नतीच्या अंतिम सुखाच्या हेतूनेंच निर्माण झालेलें आहे. त्याचा अनुभव ज्याचा त्यानें वैयक्तिक रीत्या सूक्ष्मपणें आत्मपरीक्षण करून साध्य करणे व स्वतःचें कल्याण स्वतः साधणें. साधु सत्पुरुषानी दाखविलेल्या मार्गांचा सूक्ष्मपणे अभ्यास करून त्यातल्या अडी अडचणी समजून न घेता ते थोतांड आहे असे समजून त्यावर चिखलफेक करणे म्हणजे स्वतःच स्वतःच्या हाताने नाश करून घेण्यासारखे आहे.

या उलट मानवी मूल्याचे साह्यानें त्याचा उकल करून घेणे व त्यात बौद्धिक भर घालून मानवी कल्याणासाठी झटणे हें प्रत्येक मानवाचें आद्य कर्तव्य आहे. प्रत्येक धर्माचा अवतार हा मानवी दुःखांकडे पाहून झालेला आहे. ज्या मानवी मूल्यांचा उदय मानवी कल्याणाच्या उद्देशाने झाला त्याच मानवी मूल्यांचे महत्वास आज आपण दुरावलों आहोंत.

तरीपण सार्वत्रिक जागतिक व्यवहारांत मानवी मूल्यांना डावलता आलेलें नाहीं. मानवाच्या उत्कर्षाचा अंतिम हेतू म्हणजेच रामराज्य, असें आधुनिक युगांतही आपण मानतों.

मानवी मूल्यांस आकाररूप देण्यासाठी वेद, रामायण, महाभारत आदि ग्रंथांची रचना करण्यांत आली. ती सत्य असो वा कल्पित असो, त्यांचें महत्व नाकारतां येणार नाहीं. म्हणूनच त्याचे अनुवाद पाश्चात्यांपर्यंत पोचले आहेत. कोणत्याही गोष्टीचा वापर ज्या अस्त्राने केला जातो त्याची जबाबदारी त्या अस्त्रावर नाहीं तर त्या प्रेरक शक्तीवर आहे.

मानवानें सुरवातीस शस्त्रांची उत्पत्ती ही हिंस्र श्वापदांच्या पासून स्व-संरक्षणासाठी केली परंतु त्याचा वापर पुढे स्व-बांधवांचा नाश करण्यासाठी होत आहे.

स्वार्थाच्या पोटीं मुत्सद्देगिरीचा जन्म झाला आणि मूळ मानवी मूल्यांचा हेतु बाजूस राहून अनेक जातिपंथ निर्माण झाले. परंतु कोणत्याही काळात मानवी मूल्यांचें महत्व नाकारणें शक्य झालेलें नाहीं. आणि आजमितीस देखील मानवी मूल्यांस आपण अलिप्त ठेवू शकणार नाहीं. ज्या दिवशीं मानवी मूल्यांचा विनाश होईल त्याच दिवशीं मानव नष्ट झाला असें समजावे !

# गीतेचें सारभूत मार्गदर्शन

## (लेखांक तिसरा).

लेखक—डॉ. रा. य. परांजपे, रत्नागिरी

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोसि मे ॥** भ. गी. अ. १८।६६



पहिल्या लेखाचे शेवटीं या श्लोकांतील भगवान कोण ? त्याचे स्वरूप काय ? हें ठरविण्यासाठीं दहाव्या अध्यायाकडे वळले पाहिजे असें सांगून झालें. परंतु दुसऱ्या लेखांत प्रत्यक्षपणें दहाव्या अध्यायाच्या आशयांत प्रवेश करतां आला नाहीं. फक्त आपण दहाव्या अध्यायाच्या प्रवेशद्वारात येऊन ठेपलो आहों. आतां ज्ञानोबाच्या ओव्यांचा मागोवा घेत, आपण दहाव्या अध्यायाच्या अंतरंगांत शिरून, भगवंताचें दर्शन घेण्याचा प्रयत्न करणार आहोंत. तेथे भगवंताचें यथार्थदर्शन घडतें का यापुढें प्रवास करावा लागतो, तें अनुभवानेंच ठरणार आहे.

नवव्या अध्यायांतील ज्ञानविज्ञान किंवा राजविद्या, राजगुह्य नीट समजल्यामुळें, अर्जुनाला आपणाला आतां भगवंताचे संपूर्ण ज्ञान झालें असें वाटलें परंतु भगवंताला मात्र तेवढ्यानें सर्व सांगून झाल्याचें समाधान झालेलें नव्हते. आपला शिष्य अर्जुन हा पूर्णबोध न होतांच, तृप्तीचे ढेकर देतांना पाहून, देवाला बरें

वाटलें नाहीं. त्याला विचारप्रवृत्त करण्यासाठीं, त्यांनी दहाव्या अध्यायांत आपणहून झटका दिला.

**न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः।**
**अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः॥** भ. गी. अ. १०/२

**ओवी– परी किरीटी तूं मातें। नेणसी ना नीरूतें॥**
**तरी तो गा जो मी येथें। तें विश्वचि हें॥** ज्ञा. अ. ओ. १०/६३

भगवान म्हणतात– अर्जुना! तूं मला खरोखर जाणतच नाहींस. हा जो येथें दिसत आहे, तो वास्तविक तत् पदानें ज्याचें वर्णन केलें जातें तोच आहे. त्याचप्रमाणें हा ओ म्हणजे, स्थूल व दृश्य स्वरूपांतहि असून, सर्व विश्वाकार आहें. समजलास!

अरे, पण तूं मला काय जाणणार!

**ओव्या– एथ वेद मुके झाले। मन पवन पांगुळले॥**
**रातीवीण मावळले। रवि शशी जेथ॥** ज्ञा. अ. ओ. १०।६४
**अगा उदरींचा गर्भू जैसा। न देखे आपुलीये मातेची वयसा॥**
**मी आघवेयां देवां तैसा। नेणवे कहीं॥ ओ. ६५॥**
**आणि जळचरां उदधीचें मान। मशका नोलांडवेचि गगन।**
**तेंवीं महर्षीचें ज्ञान। न देखेचि माते॥ ओ. ६६॥**
**मी कवण पां केतुला। कवणाचा कैं जाहला॥**
**या निरूति करितां बोला। कल्प गेले॥ ओ. ६७॥**
**कां जे महर्षी आणि या देवां। येरां भूतजातां सर्वां।**
**मी आदि म्हणोनि पांडवा। अवघड जाणतां॥ ओ. ६८॥**
**उतरले उदक पर्वत वळघे। जरी झाड वाढत मुळीं लागे॥**
**तरी मियां झाले नि जगे। जाणिजे मातें॥ ओ. ६९॥**
**कां गाभेवणें वटू गिवसवे। जरी तरंगीं सागरू सांठवे।**
**कां परमाणूमाजीं सामावे। भूगोलु हा॥ ओ. ७०॥**
**तरी मियां झालिया जीवां। महर्षी अथवा देवां।**
**मातें जाणावया होआवा। अवकाशु गा॥ ओ. ७१॥**

भावार्थः—अर्जुना, वेदांनीं मला जाणण्याचा प्रयत्न केला पण मी त्यांच्या जाणिवेचा विषय होऊं शकत नाहीं, असें त्यांना समजल्यावर त्यांनीं मौन स्वीकारलें. जे कांहीं त्यांनी जाणले, तें मी नव्हे म्हणून ते नेति नेति म्हणून

गप्प बसले. मनपवनाशीं खेळ खेळणारें, मनपवनच तेथें पांगुळल्यानें निराश झाले. सूर्यचंद्रादिक तेजें त्याला प्रकाशित करूं शकत नसल्यानें, तेथें सूर्यचंद्रहि मावळले आणि असें पहा आईच्या उदरांतील गर्भ हा आईचे रूप, वय कांहीं जाणूं शकेल का ? त्याचप्रमाणें माझे गर्भस्थच असे सर्व देव, मला कसें जाणणार ? जळचरांना समुद्राचें मोजमाप करतां येणें किंवा मशकाला आकाश ओलांडून पलीकडे जाणें जसें अशक्य आहे त्याचप्रमाणें महर्षींना सुद्धां मला जाणतां येणें अशक्यच आहे. मी कोण ? केवढा ? कोणाचा ? कधीं जन्मलों ? असा विचार अनेक कल्प चालू आहे परंतु असा विचार करणारे देव महर्षी किंवा इतर भूतजात, अद्यापपर्यंत असमर्थ ठरले आहेत. कारण उघडच आहे. सर्वांचा आदि आधार मी असून सर्वांची दृष्टि मात्र बहिर्मुख आहे. त्यामुळें हें कसें घडतें पहा. पर्वतावरून सुटलेला पाण्याचा प्रवाह, शिखर गांठील का ? झाड वाढत वाढत मुळाला लागेल कां ? आतां हें जर शक्य असेल तरच माझ्यापासून झालेले जग मला जाणूं शकेल. आणखी असें पहा, गर्भावस्थेंत असलेल्या पानाच्या अंकुरानें वटवृक्ष जर झांकला गेला किंवा तरंगांत संपूर्ण समुद्र सांठवतां आला अथवा एका परमाणूंत सर्व भूगोल सामावला गेला तरच माझ्यापासून निर्माण झालेले जीव, महर्षी किंवा देव मला जाणण्याला समर्थ ठरतील !

या प्रमाणें भगवंतांनीं, आद्य अशा आपल्या तात्त्विक स्वरूपाचे वर्णन करून सांगितल्यावर, भगवंताचें स्वरूप कसें जाणावें याची खूण त्याला पटली. जाणिवेच्या बळावर भगवंताला जाणण्याचें प्रयत्न, त्यानें सोडून दिले व भगवंताच्या म्हणजे आपल्याच स्वसंवेद्य अशा स्वरूपाचा त्यानें ठाव घेतला. भगवंतांनीं स्वतःच त्याला योग्य अशी हातोटी दाखविल्यानें, अर्जुनाला बोध होऊन त्यानें धन्यतेचे उद्गार काढले आतां अर्जुन भगवंताचें वर्णन, स्वानुभवानें कसें करूं लागला तें पहा—

**ओव्या :**

**तरी होसी गा तूं परब्रह्म । जें या महाभूता विसंवते धाम ॥**
**पवित्र तूं परम । जगन्नाथा ओ ॥ ४९ ॥**
**तूं परमदैवत तिहीं देवा । तूं पुरूष जी पंचविसावा ॥**
**दिव्य तूं प्रकृतीभावा । पैलीकडे ॥ १५० ॥**
**अनादिसिद्ध तूं स्वामी । जो नाकळिजसी जन्मधर्मी ॥**

**तो तूं हें णाम्ही । जाणितलें आतां ॥ १५१ ॥**
**तरी साचचि हें कैवल्यपती । मज त्रिशुद्धी आली प्रतीती ॥**
**जे तूं देवादानवांचिये मती । जोगा नव्हसी ॥ १७४ ॥**
**पथ आपुलें वाडपण जैसें । आपणाचे जाणिजे आकाशें ।**
**कां मी एतुली घनवट ऐसें पृथ्वीचे जाणे ॥ १७६ ॥**
**तैसा आपुलीये सर्व शक्ती । तुज तूंचि जाणसी लक्ष्मीपती ।**
**येर वेदादिक मती । मिरवती वायां ॥ १७७ ॥**
**तैसें हें तुझे जाणणें आहे । म्हणोनि कोणाही ठावके नोहे ॥**
**आतां तुझे ज्ञान होये । तुजाचे जोगें ॥ १७९ ॥**

अर्जुन आतां भगवंताचे वर्णन करतांना, साकार स्वरूपाचे करीत नाहीं हें लक्षांत घेण्यासारखें आहे. तो म्हणतो—देवा, तूं या महाभूतांचें विसावा घेण्याचे ठिकाण जें परब्रह्म, तेंच आहेस. तुला शुद्धाचा व अशुद्धाचा, कशाचाहि मळ लागत नाहीं इतका तूं परमपवित्र आहेस. सगळ्या जगाचा नाथ आहेस. तूं ब्रह्मा, विष्णू आणि महेश, यांचे परमदैवत आहेत. चोवीस तत्व प्रकृतीच्या पलीकडील जो पंचविसावा पुरुष, तो तूं आहेस. तूं दिव्य आहेस. तुला आदि असें कोणतेहि तत्व नसून, तूंच सर्वांचा अनादिसिद्ध असा स्वामी आहेस. त्यामुळें तुला जन्माचा विटाळ लागलेला नाहीं. असा जो पूर्ण निर्लेप,तोच तूं आहेस हें आम्ही जाणले आणि म्हणालास, तें खरेंच याची मला प्रचिति आली. त्यामुळे मी निःशंकपणें म्हणूं शकतो कीं तूं देवदानवांच्या बुद्धीचा विषय होऊं शकत नाहींस. आकाशाचा विस्तार किंवा पृथ्वीचें घनत्व हें पृथ्वीनेंच जाणावे. त्याचप्रमाणें तुझ्या सर्व शक्तीचे मोजमापहि फक्त तूंच जाणूं शकतोस! वेदांची जाणीवही येथे कुचकामी आहे. त्यांची ज्ञातेपणाची प्रतिष्ठा फोल आहे. तुझें जाणणें असें दुवाड असल्यामुळें तुझें ज्ञान फक्त तुझ्याजोगतेंच आहे, याबद्दल माझ्या अनुभवानेंच माझी खात्री झालीआहे.

अर्जुनाचा वरील अनुभव, हा भगवंताच्या अव्यक्त अशा, त्रिगुणरहित निर्गुण स्वरूपाचा आहे. परंतु भगवान आपले संपूर्ण स्वरूप व्यक्त करतांना, तें केवळ 'निर्गुणच' असल्याचें सांगत नाहींत तर '**तो गा जो मी येथें । तें विश्वचि हे ॥** असे म्हणत आहेत. अर्जुनानें तो भगवंत कोण, हें जाणून त्याचें वर्णन केलें परंतु त्याच्या मनांतील भाव मात्र असा आहे कीं, आपल्यापुढें हा

जो भगवान उभा आहे, तोच तो निर्गुण आहे आणि सगुण परमेश्वर निर्गुण असूनहि, सर्व गुणत्रयानें साकार विश्वरूपहि आहे. या साकार परमात्म्याची सगुणनिर्गुण ऐक्य बोधानें, अभेदभावाची प्रचीती यावी म्हणून, तो परमेश्वराला विभूती सांगण्याविषयीं विनंती करूं लागला. भगवंतांनीं भेदाच्या कहाणींत अभेदाची कहाणी सांगितली व अर्जुनाला ती अभेदाने पटली असें वर्णन असून अर्जुनानें आतां द्वैताद्वैतभावानें एक भगवंतच असल्याची कबुली, या दहाव्या अध्यायाच्या शेवटीं दिली आहे.

दहाव्या अध्यायाचा एथवर विचार केल्यावर 'मन्मना भव' या श्लोकांतील 'भगवान' ज्याला मी म्हणतात त्याचे स्वरूप काय धरावें, हे नीट लक्षांत येण्यासारखें आहे. अर्जुनाने भगवंताचा मागील उपदेश, आस्थेने ग्रहण केलेला असल्याने व अनुभविलेला असल्याने, त्याला या श्लोकाचे मर्म ताबडतोब समजणारे आहे. आपण, त्याला काय समजले असेल हे पहाण्याकरितां, मागील संदर्भ ध्यानी घेणे अत्यावश्यक आहे. एवढेच.

आता भगवान म्हटल्यानंतर, सगुण निर्गुण आणि व्यापक अशा त्रिविध रूपांत त्याला जाणणे आवश्यक आहे. अर्जुनाने भगवंताचे आद्य तत्व जाणून ते स्वसंवेद्य असल्याचें कबूल केलें आहे. यानंतर विभूतींच्या स्वरूपांत, त्यानें त्याचा वैभवी विलास श्रवण केला आहे, परंतु समग्र विश्वरूप पहावे अशी उत्कंठा त्याला उत्पन्न होऊन, त्यानें भगवंताजवळ विश्वरूपदर्शनाची लालसा प्रकट केली आणि भगवंतांनीं त्याला जें विश्वरूपदर्शन दिलें त्याचे पुढें अकराव्या अध्यायांत सविस्तर वर्णन केलेलें आहे.

दहाव्या अध्यायांत स्वसंवेद्य अशा परम तत्वाला, भगवान स्वतः, मी म्हणून संबोधित आहेत. त्यानंतर तेंच तत्व विश्वरूपहि आहे, हें अकराव्या अध्यायांत दाखवून दिलें आहे व हें सर्व दाखवून देणारा भगवान, स्वतः अर्जुनापुढें उभा आहे. यांतील भक्तिमार्गाच्या दृष्टीनें, भक्ताला कोणत्या स्वरूपांतील भगवान अत्यंत प्रिय आहे हें पहावयाचे आहे. त्याचप्रमाणें अव्याप्त अशा आद्य तत्वाचा उपासक, विश्वरूपाचा उपासक आणि सगुण साकार श्रीकृष्णाचा उपासक, यांतून भगवंताला सर्वांत प्रिय कोण ? का सर्वच सारखे ? असा सहजच प्रश्न उभा रहातो. याचें स्पष्ट उत्तर बाराव्या अध्यांत आपण पाहू शकतो. दहाव्या अध्यायांत सुरवातीलाच भगवंतांनीं अर्जुनाला 'मातें

नेणसीचि ना निरुतें ' म्हणजेच, "मला तूं खरोखर जाणत नाहींस" असें म्हटल्याचें, आपण पाहिलें आहे. यानंतर दहाव्या व अकराव्या अध्यायांत, आपलें स्वरूप खरोखर योग्य रीतीनें जाणावे, यासाठीं भगवंतांनीं आपलें सम्यक स्वरूप त्याला, अगदीं स्वानुभवानें समजून दिले आहे. अर्जुनाला अकराव्या अध्यायांत एवढें अगदीं निःसंदिग्ध समजून चुकलें आहे कीं, आपल्यापुढें उभा असलेला भगवान हा, तो म्हणजे परब्रह्मच असून, सर्व विश्वरूपानेंहि तोच नटलेला आहे. म्हणजेच ' तो गा जो मी येथें । तें विश्वचि हें । हें भगवंताचे म्हणणे त्याला यथार्थत्वानें पटलें आहे.

आतां एवढा बोध अर्जुनाला भगवंताच्या कृपेनें प्राप्त झाल्यावर, अर्जुनाचें पूर्ण समाधान होणें जरूर होतें, असें आपणाला सहजच वाटेल, परंतु अर्जुनाचें एवढ्यानें पूर्ण समाधान झालें नाहीं. अर्थात् भगवंतालाही, अर्जुन कृतकृत्य झाला असें वाटणें शक्य नव्हते. अकराव्या अध्यायांतील संपूर्ण अनुभव, आणि भगवंतांनीं सांगितलेलें तत्वज्ञान, यामुळें अर्जुन एका प्रकारें सुखी झाला होता तथापि, एक नवीनच बोच त्याच्या अंतःकरणाला टोंचूं लागली आणि बाराव्या अध्यायाचा उगम, अर्जुनाच्या या शंकेंतूनच झाला आहे.

बाराव्या अध्यायांतील अर्जुनाच्या शंकेचें, भगवंतानीं जें उत्तर दिलें आहे त्याचा विचार केल्यावरच, आपणाला ' मन्मना भव ' या श्लोकाचा योग्य असा अर्थ, प्राप्त होणार आहे आणि तो बाराव्या अध्यायांतील योग्य अर्थ ध्यानीं यावा म्हणून, आपण येथवर मागील संदर्भाचा मागोवा घेतला आहे. पुढील लेखांत भक्तिशास्त्राचा एव महान सिद्धांत, आपणाला समजून येणार आहे.

# ज्ञानदीप लावूं जगीं

लेखक :- गणेश विष्णु कविटकर, एम्. ए.

(लेखांक पहिला)

**सुमारें सातशें वर्षांपूर्वींच्या काळांत होऊन गेलेल्या संत नामदेवानीं अखिल भारतभर त्या काळीं पायीं दौरा करून वेगवेगळ्या प्रांतांतील विविध भाषी जनतेंत भक्तिमार्गाचा कसा परिणामकारक प्रचार केला व तत्कालीन मुसलमान बादशहांनाही आपल्यापुढें कसें वाकायला लाविलें याची ही सुरम्य कथा आहे. श्री. कविटकर यानी ती अधिकारवाणीनें सांगितली आहे.**

'ज्ञानदीप लावू जगीं' या काव्यपंक्तीत नामदेवांनी म्हटल्याप्रमाणे ज्ञानज्योतीवर असंख्य दीप उजळून मानवी जीवन उज्ज्वल करण्याचे त्यांचे जीवनध्येय



होते. ज्या शब्दांनी जनताजनार्दन डोलू लागेल, सर्वत्र प्रेमभाव वाढेल आणि आत्मज्ञानाचा दीप प्रज्वलित होईल असे साहित्य निर्माण करू अशी प्रेरणा, "बोलू ऐसे बोल" या अभंगचरणात व्यक्त केली आहे. जनतेचा अध्यात्मिकदृष्ट्या विकास व्हावा हेच त्यांचे ध्येय होते. त्यामुळे ते स्वतः व त्यांची भाषा प्रांतिक मर्यादेत अलिप्तपणे गुरफटलेली नाही. भक्तिप्रचारासाठी त्यांनी त्याकाळच्या लोकसरस्वतीत म्हणजे हिंदी भाषेत रचना केली आणि आयुष्यभर भारतयात्रा चालू ठेवली. ते इतर प्रांतीय भाषा शिकले. ते महाराष्ट्रातून निघाले ते थेट दक्षिणेस म्हैसूर

(कर्नाटकासह), तामिळनाड, रामेश्वरपर्यंत गेले; व उत्तरेकडे गुजरात सौराष्ट्र, सिंधुप्रदेश, राजस्थान, मारवाड, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, पंजाब, हरियाना, हिमाचल प्रदेश व पुनः पंजाबात भक्तिप्रचार करीत गेले. पंजाबी भाषेत त्यांनी पद्ये लिहिली. प्रांताप्रांतातील भाषा आत्मसात् केल्या आणि त्यांचा उपयोग लोक-जागृतीसाठी केला. त्या प्रचार कार्यात त्यांनी तथाकथित कनिष्ठ जातींना चांगल्या संस्कारांनी वरउचलून धरले व तथाकथित श्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या जातींना इतरांच्या चालीने चालविण्यास शिकविले. देवभक्तीची एकच धुमाळी देशभर उडवून दिली आणि भक्तिभावाचे मस्त वातावरण उभ्या देशात त्यांनी संचारत ठेवले.

## तो आणीबाणीचा काळ

नामदेवांचा काळ इ. स. १२७० ते १३५० होय. तो काळ भारताच्या इतिहासात आणीबाणीचा होता. इस्लामी आक्रमणासमोर भारतातील सिंहासने कोसळून पडत होती. लुटालूट, जाळपोळ, विध्वंस, सक्तीची धर्मांतरे इ. नाना संकटानी जनता हैराण झाली होती. तेराव्या शतकात आर्यावर्ताचे स्वातंत्र्य नष्ट झाले. मुसलमानानी सत्तेची उत्तरेकडून रंगत आलेली लाट दक्षिणेत देवगिरीपर्यंत येऊन थडकली. शके १२४० मध्ये शंकरदेवांनी तिचा प्रतिकार करीत स्वातंत्र्यरक्षणार्थ आपला देह कुर्बान केला. त्याचबरोबर महाराष्ट्राचे स्वातंत्र्य गेले. शके १२१८ मध्ये महाराष्ट्रातील ज्ञानसूर्य अस्तास गेला. ज्ञाने-श्वरीत वर्णन केलेली "प्रौढ प्रताप यादवांची" राजवट उमळून पडली. परकीय आक्रमणाला पायबंद घालू शकणारे राजकीय व लष्करी सामर्थ्य उरले नाही. धर्म व समाज यावर एक घोर संकट ओढवले. जनता किंकर्तव्यमूढ झाली. परचक्राच्या आक्रमणाखाली प्राचीन कालापासून लोकांच्या मनात रुजलेली देवधर्माची आस्था नाहीशी होवू लागली. नामदेवांना ज्ञानेश्वरांनंतर पन्नास वर्षे आयुष्य लाभले. या पन्नास वर्षांच्या दीर्घ कालांत त्यांनी कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत अनेक पदयात्रा केल्या. त्याकाळच्या असहाय, भयाण, अंधःका-रमय परिस्थितीत चाचपडणाऱ्या जनतेला अभय देणारा हा महापुरुष भीवरेच्या तटावरून उत्तरेस गेला. त्याने समाज संघटित व जागृत केला आणि भक्ति-मार्गाचा झेंडा व समाजभावनेची स्फूर्ती पुढें नेली.

## ज्ञानेशांची सोबत

ज्ञानेश्वरादि संतांबरोबर नामदेवांनी उत्तरेकडील पहिली तीर्थयात्रा शके १२१३ ते १२१८ च्या दरम्यान केली. या तीर्थटणात गोराकुंभार, परिसा भागवत, विसोबा खेचर, निवृत्तिनाथादि भावंडे व अनेक वारकरी संतश्रेष्ठहि त्यांच्या बरोबर होते. त्यातच ज्ञानियांचा राजा ज्ञानेश्वरही असल्यामुळे उत्तर भारतात ह्या संतांचा वैयक्तिक प्रभाव न पडतां त्याचा सामुदायिक प्रभाव पडला. त्यामुळेच भक्तमालेंत ह्यापैकीं बऱ्याच संतांचीं चरित्रें वर्णिलीं आहेत.

ज्ञानदेवांच्या समाधीनंतर इस्लामी अक्रमणे होत असता ज्ञान व भक्ति यांचा समन्वय करून नामदेवांनी भागवत धर्माची ध्वजा कित्येक वर्षे डौलाने फडकत ठेवली. यानंतर मात्र नामदेवांना आंतरीची हाक ऐकू आली; व " मामनुस्मर युध्य च " ही आज्ञा झालेल्या अर्जुनाच्या निर्भयतेनें ते प्रथम दक्षिणेकडे व नंतर उत्तरेकडे इस्लामी आक्रमणाच्या कुरुक्षेत्राकडे गेले. नामदेवांच्या आयुष्यातील हे अभिनिष्क्रमण होते. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' ह्याचा साक्षात्कार झालेल्या नामदेवांना जीवन्मुक्तावस्थेत तीर्थयात्रेची ओढ असणे सुतराम् असंभाव्य होते; परंतु ईश्वरी संकेत असा होता कीं, परकीय आक्रमणे होत असणाऱ्या उत्पात भूमीत जाऊन तेथील जनतेला धीर देऊन संस्कृतिरक्षणाचे व वर्धनाचे महत्वाचे कार्य नामदेवांना करावयाचे होते. त्यांना भारताच्या राष्ट्रीय एकतेचे कार्य करावयाचे होते आणि ही अवघड कामगिरी त्या बिकट काळांत त्यांनी एकाकी व असहाय अवस्थेत उत्तर आयुष्यात पार पाडली !

## दुसरी पदयात्रा

नामदेवांनी दुसरी पदयात्रा दक्षिण भारतात केल्याची माहिती नवीन मिळालेल्या तीर्थावळीतील तीर्थयात्रेतील गावांच्या नावांवरून मिळते. श्रीशैल, शिखर, मल्लिकार्जुन, अरुणाचल, चिदंबर, विष्णुकांची, रामेश्वर, ताम्रपणिका, आळुवा कन्याकुमारी, हरिहरेश्वर, जनार्दन या तीर्थांच्या ठिकाणी शके १२१८ च्या सुमारास जाऊन नामदेवांनी भागवत धर्माचा, मानवधर्माचा, प्रचार केला. त्यामुळे दक्षिणभारतातील राज्यांतून विखुरलेला दर्जी छिप्पिगा या अल्पसंख्य लोकावर त्याचा प्रभाव पडला. तेव्हापासून ती अल्पसंख्य जमात आपणास नामदेव म्हणवू लागली. मद्रास ( तामिळनाडु ) राज्यातील भूसागर व मल्लाया जमाती नामदेव हेहि आपल्या ज्ञातीचे समानार्थक नाव मानू लागले.

Castes & Tribes of Southern India, by Edger Thurston, C. I. E, Vol. II, Government Press, Madras, 1909, p. 98, 243 )

तसेच १९०१ च्या म्हैसूरच्या खानेसुमारीत पुढील माहिती मिळते---

Darjis are classified as follows :--

1 ) Darji, Chippiga or Namdeo, 2 ) Rangare". The first three known by the collective name of darji are professional tailors while the Rangares are also dyers and calico printers ( Mysore census report, 1901 )

## भारताची प्रदीर्घ यात्रा पायीच

यानंतर संपूर्ण भारतवर्षाची प्रदीर्घ यात्रा नामदेवांनी पायीच केल्याची माहिती नवीन उपलब्ध झालेली आहे. ही यात्रा शके १२२० ते १२२६ या सहा वर्षातील दिसते. वैं. प्र. सी. सुबंध यांना पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरात शके १५०३ मध्ये लिहिलेले एक जुने हस्तलिखित मिळाले. हे तीर्थयात्रेचे टांचण चवदा अभंगात आहे. त्यात नामदेवांनी सर्व भारताची जी पदयात्रा केली त्याचे वर्णन संक्षेपाने केलेले आहे. ही तीर्थयात्रा नामदेवांनी एकाच वेळी व एकट्यानेच केली असल्याचेहि दिसून येते. कारण इतर संतांबरोबर असल्याचा कोठेहि उल्लेख नाही. या प्रदीर्घ यात्रेत नामदेव काही तीर्थ क्षेत्रात अनेक महिने रहात असत. " षण्मास राहिल्या द्वारकेचे पुण्य । एके दिवशी संकोद्धारी तेथे जाऊनि पाहिला देव । " या अभंगचरणावरून द्वारकेला नामदेवांचा मुक्काम सहा महिने होता व या मुक्कामात ते संकोद्धाराला गेल्याचे कळते. या पदयात्रेची सुरुवात पश्चिमेकडून झाली. नंतर उत्तरेकडून पूर्वेकडील तीर्थक्षेत्रे पहात पहात दक्षिणेकडून ते पंढरपूरक्षेत्री परत आल्याचे दिसते. या सहा वर्षांच्या प्रदीर्ध यात्रेस पंढरपूराहून प्रथम सुरूवात झाली . ती पुढील क्रमाने पूर्ण झाली. या तीर्थ क्षेत्रांची नावे:—नीरा-भीवरा संगम, गोदावरी, नाशिक–पंचवटी, घृष्णेश्वर, ओंकार, मांधाता, द्वारका, रैवतक, ढवळपूर, मुचकुंदगुंफा, प्रभात, सोरटीसोमनाथ, सिद्धपूर, पुष्कर, कुरुक्षेत्र, ठाणेंश्वर, यमुनातीर, इंद्रप्रस्थ, हस्तिनापूर, अंतर्वेदी, मायापूर, हरिद्वार, हृषीकेश, देवप्रयाग, केदार, कैलास, बद्रिनारायण, मानससरोवर,

गंडकी, अयोध्या, नैमिष्यारण्य, मधुपुरी, गोकुळ, वृंदावन, कालियाडोह, गौतमेश्वर, मिथिला ( जनकनगरी ), उज्जयिनी, प्रयाग, काशी, विश्वेवर, गया, गंगा-सागर संगम, महाबळेश्वर, व पुन्हा परत पंढरपूर अशी ही सहा वर्षांची पदयात्रा होय. नामदेवांनी या तीर्थयात्रेवरील पुढील अनुभव सांगितले आहेत:—

गंगेचा ओघ पहावया जातां । कष्टलों बहुत शरीरें ।
अवघड मार्ग न दिसे पुढें । मग तारिलें विठ्ठलें ॥
तेथून जातां उत्तरें पंथे । खुंटली शरीरासी आंस ।
हिमाचा पर्वत उल्लंघितां । बहु झालों कासावीस ॥
वज्रकीटाचे लागले पाणी । जीवें झालों कासावीस ।
हिंवाच्या लहरी आंगी चढोनि । चढले श्वास उच्छ्वास ।
श्रीहरीच्या कृपें तरलों ॥ ११ ॥

पुलिंद, पुल्कस, यवन, खस हे मद्यमांस भक्षक राक्षस त्रास देतात म्हणून मानस सरोवरा पलिकडच्या भागात नामदेव गेले नाहींत.

## कंदुरीची फुले झाली

नामदेवांच्या चवथ्या पदयात्रेची कल्पना देणारा पुरावा म्हणजे इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी शके १८४६ मध्ये प्रसिद्ध केलेली "महिकावतीची ऊर्फ माहीमचीं बखर" होय. ही बखर शके १४०० म्हणजे इ. स. १४७८ मध्ये लिहिलेली आहे. त्यात पान क्रमांक १०३ वर राजा रामदेव व त्याचा करणाधिप हेमाद्रि हे दोघेहि गुप्त झाल्याचे आढळते आणि पंढरपूर येथे " नामदेव सिंपा मोठा हरिभक्त होता, त्यास वाराणसीच्या यात्रेस जात असताना पातशहाने काफिर समजून बोलावून घेतले आणि सानक कंदुरी पुढे ठेवून ती भक्षण करण्याविषयी जबरदस्ती करूं लागला. तोंच त्या कंदुरीची फुले झाली, इत्यादी माहिती मिळते.
बखरीतील मूळ मजकूर असा—

त्यानंतर निकामलिक या समागमे सैन्य देवाने रवाना केला ॥ त्याण्हे सीद महाल विलाईत घेतली ॥ त्यावर देवगिरी काबिज केली ॥ तेथेही म्लेंच्छ जये पावले ॥ रामदेवराजा आणि हेमाडपंत हे दोघे गुप्त जाले ॥ त्याऊपर महाराष्ट्र-

राजावरि पातस्याही हल्ला जाला ॥ मग सर्व विलाय यावत् देवगिरी राज्य दस्त केली ॥ त्यानंतरे मलिक बहादुर प्रमादाला ॥ ते समई श्रीपंढरपूरी नामदेव सिंपा हरिभक्त होता ॥ तो श्रीवाराणसीचे यात्रेस जाता पातस्यने बोलाविला ॥ हिंदु कुफराणदार म्हणोन त्याचा अंत पाहो लागला ॥ त्यास खाने सानक कंदुरि मोहोर ठेविली ॥ भक्ष म्हणोन बलात्कार करो लागला ॥ ते समई श्रीविठ्ठल भक्त कैवारी ॥ त्या कंदुरीची पुष्पे जाली ॥ ते करामत देखोन पातस्या आश्चर्य पावला ॥ तेधवां नामदेवाप्रत विचारों लागला ॥ जर तू जातीचा कोण होसी ॥ त्याणे सांगितले की माझी जात सिंपा ॥ येसे बोलिले मग नामा दास्त केला ॥ त्याचा आशीर्वाद पातस्यासी फळला ॥ तो पातस्या प्रमादला ॥ त्याचा पुत्र सुलतान तोगिल ॥ त्याचा पूत्र सुलतान पेरोजस्या ॥

## सुलतानाशी भेट

मालिक बहादुर ऊर्फ मालिक गाझी बेग ऊर्फ घियासुदिन हा त्यावेळी दौलताबादेचा सुलतान होता. त्याची आणि नामदेवाची भेट इ. स. १३२१ ते १३२६ (शके १२४३ ते १२४६) च्या काळात केव्हातरी वाराणसीस जात असता झाली असावी. वरील चमत्कार ज्या स्थळी झाला, त्या स्थळाची व विरोध करणाऱ्या सुलताना संबंधीची माहिती या बखरीवरून मिळते.

शिखांच्या आदिग्रंथात ही चमत्कार कथा निराळ्या संदर्भात गोविली आहे. त्यात अर्धमृत (बिसमली) गाय पुढे करून सुलतानाने ती जिवंत करण्यास नामदेवांना फर्माविले. त्या परीक्षेत नामदेव उत्तीर्ण झाले. सुलतान व त्याचे काजी मुल्ला कसे पराजित झाले, या अद्भूत प्रसंगांचे वर्णन वेगळे कथानक देऊन केलेले आहे. लोकामध्ये खळबळ उडवून देणारी ही घटना घडली त्यावेळी नामदेव व सुलतान यांच्यामध्ये एक उद्बोधक संवाद झाला. तो मनन करण्यासारखा असून त्यावेळी नामदेवांच्या मनांत कोणते विचार घोळत होते याचे स्पष्ट दर्शन होते. हिंदी पद्यातील त्या संवादाचा आवश्यक भागाचा मराठी अनुवाद पुढे दिला आहेः—

## शेवटीं बादशहा शरण आला

सुलताताने पृच्छा केली, "ऐक रे नामदेवा ! तो राम तुझ्या कामाला कसा येतो ते पाहू ?" (असे म्हणून) सुलतानाने नामदेवाला बांधून टाकले ; व

तो म्हणाला, "तुझा हरी – विठ्ठल मला पाहूं दे ! मेलेली गाय जीवंत करून दे नाहीतर जागच्याजागी तुझे मस्तक धडापासून वेगळे करीन. यावर नामदेव म्हणाले, "बादशहा ! असे कसे होईल ? मेलेले कोणालाहि जीवंत करता येणार नाही. राम जे करील तेच होईल ! हे ऐकून बादशहाचा अहंकार वाढला. त्याने हत्तीला चमकावून नामदेवांच्या अंगावर सोडून दिले ! ( हे पाहून ) नामदेवांची आई रडू लागली. ती नामदेवांना उद्देशून म्हणाली, रामाला सोडून खुदाची भक्ति कां करीत नाहीस ? नामदेवांनी उत्तर दिले,"मी तुझा मुलगा नाही आणि तू माझी आई नाहींस. देह पडेपर्यंत मी हरीचे गुणगान करीत रहाणार. त्या हत्तीने नामदेवावर सोंडेने प्रहार केला. हरिकृपेने नामदेव त्यातून वाचले. ते पाहून बादशहा म्हणाला, "काझी, मुल्ला मला सलाम करतात; परंतु या हिंदूनें माझा अपमान केला आहे !" लोक म्हणाले, " हे बादशहा ! आमची विनंती ऐका. नामदेवाच्या भारंभार सोने घेऊन त्याना सोडून द्या." बादशहा उत्तरला "स्वधर्माचरण सोडून मी द्रव्यसंग्रह कसा करूं ?" पायात बेडी आणि हातात टाळ घेऊन नामदेव श्रीगोपालाचे गुणगान करीत होते. ते म्हणाले,

" गंगजमुन जऊ उलटी बहै । तऊ नामा हरी करता रहै ॥ ( श्री गुरु० पृ० ११६५ ) म्हणजे गंगायमुना उलट्या वाहू लागतील तेव्हाच नामदेव हरिगुणगान करण्याचे बंद करील.

बादशहा शेवटी शरण आला. त्यास, " तूं सत्याचे व शीलाचे आचरण कर ! " असा नामदेवांनी उपदेश केला.

## भक्तिमार्गाचा प्रचार

ज्या आत्मविश्वासाने नामदेवांनी या प्रसंगास तोंड दिले, तो आत्मविश्वास, ते चैतन्य, ती अस्मिता दिङ्मूढ झालेल्या जनतेत निर्माण करण्याची या काळात आवश्यकता होती. याच काळात भक्तिमार्गाच्या कार्यासाठी नामदेवांनी भ्रमण करून प्राणपणाने सर्वत्र चैतन्यदायी टवटवी निर्माण केली आणि अनेकांना भक्तिमय जीवनाच्या प्रवाहात आणून सोडले.

डॉ. मोहनसिंग दिवाना यांनी संपादिलेल्या "नामदेव की नई जीवनी" इ. स. १६९६ मध्ये लिहिलेल्या एका काव्यमय चरित्रात या घटनेतील सुलतानाचे नाव शाह सलिम असे दिले आहे. 'भक्तिमाल' नावाच्या परिचित काव्यात ही घटना फिरोजशहाच्या कारकीर्दीत झाली असे त्या काव्याचा लेखक

अनंतराम लिहितो. सुलतान फिरोजशहा खिलजी हा नामदेवांच्या समकालीन होता, तो दिल्लीच्या सिंहासनावर इ. स. १२८२ मध्ये बसला इ. स. १२९६ मध्ये कालवश झाला. म्हणजे, वरील घटना शके १२०४ ते १२१८ च्या सुमारास झाली असावी असे अनुमान करता येते. पण हे इतिहासविरुद्ध आहे असे पंजाबी संशोधकांचे म्हणणे आहे. त्यांच्या मते ही घटना महमद तुघलघ खानाच्या कारकीर्दीत इ. स. १३२५ ते १३५१ च्या दरम्यान झाली. या संदर्भात ते सांगतात की, महंमदबीन तुघलघ दिल्लीचा बादशहा असताना त्याची आवडती गाय मेल्यानंतर त्याने नामदेवजींना ती जीवंत करण्याचे आव्हान दिले होते.

## नरसी मेहत्याचे गौरवपर उद्गार

या चवथ्या पदयात्रेत नामदेवांनी कीर्तनभजनाच्याद्वारे विठ्ठलनामाचा आणि ईश्वरभक्तीचा एवढा प्रचार केला की त्याचा प्रभाव सौराष्ट्र व उत्तर भारतीय साहित्यावर झाल्याशिवाय राहिला नाही. नदी कोरडी पडली तरी तिच्या पात्रात थोडेसे उकरताच जसा पाण्याचा प्रवाह झुळझुळताना दिसतो त्याप्रमाणें नामदेवांच्या प्रवाहाचे परिणाम त्यांच्यानंतर होऊन गेलेल्या सौराष्ट्र व उत्तर भाषिकामध्ये आढळून येतात. हे नामदेवानंतर पन्नास वर्षांनी होऊन गेलेल्या भक्तकवी नरसी मेहतांच्या ( शके १३३४ ते १४०० ) नामदेवांसंबंधीं काव्यसंग्रहातील गौरवपर उद्गारांवरून दिसून येते:—

( १ ) जेणे नामानुं छापरुं छाई आल्युं ( पृ० ४ )
( ज्याने नामदेवांची झोपडी दुरुस्त केली )

( २ ) रामानुं नाम नामदेवे लीधुं ( पृ० ७ )
( नामदेवांनी रामनाम घेतले )

( ३ ) नाम हाथ ते दूध पीला....नामानुं छापरुं आल्युं छाई ( पृ० २० )
( नामदेवाच्या हातचे जो दूध प्याला, ज्याने नांमदेवांची झोपडी दुरुस्त केली. )

( ४ ) नामदेव गाय सजीवन करें.......ते नामदेवनी जीवाडी गाय (पृ० ३२)
( नामदेवांनी मृत गाय जीवंत केली........ज्या नामदेवांनी )

( ५ ) नामनुं छापलं छाई दिधुं ( पृ० ८५ )
( नामदेवाची झोपडी ज्याने शाकारून दिली )

( ६ ) नामानुं छापरुं छाईने आपीयुं कबीरानी राखी अविचल वाणी ( पृ० ५५३ )
( ज्याने नामदेवाची झोपडी उभारली, कबीराच्या अढळ वाणीचे रक्षण केले )

( ७ ) सोई नामदेवनुं देवळ फरव्युं ( पृ० ५५६ )
( ज्याने नामदेवासाठी देऊळहि फिरविले )

( ८ ) नामा हाथते दूध पीईल देवा........नामाचा छादरा दिला छई ( पृ० ५६२ )
( जो नामदेवांच्या हातचे दूध प्याला........ज्याने नामदेवाची चादर शिवून दिला )

( ९ ) पंढरपूर नगर छे एक, तो मां नामा सोई विशेक, नामदेवनुं हरिसी प्रीत ( पृ० ५७१ )
(पंढरपूर नामक एका गावात विशेष हरि प्रीती असलेले नामदेव रहात)

## राजस्थानमध्ये भजनकीर्तनाचा पाऊस

पुढे नामदेवांनी राजस्थानकडे संचार केला. ठिकठिकाणच्या मुक्कामात त्यांनी भजनकीर्तनाचा पाऊस पाडला. त्यामुळे राजस्थानच्या जीवनावर अनंतकाळ संस्कार करणारे परिणाम झाले.

राजस्थानामधील जयपूर येथील ३ मंदिरे, जोधपूर, अलवर, बिकानेर जवळ कोलायतजी येथील नामदेवरायांची विहीर, पुष्कराज येथील २ मंदिरे बगरू, संगनिर काळाडेरा इत्यादि ठिकाणी जुन्या नव्या स्वरूपात उभी असलेली १५० चे वर लहान मोठी नामदेवाची सार्वजनिक मंदिरे ही त्यांच्या राजस्थानमधील प्रचार कार्याची आजही साक्ष देतात.

# श्रीरामकृष्णांचें अवतार-रहस्य

## स्वामी विवेकानंदांचें एक हृदयस्पर्शी पत्र

सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वी अमेरिकेंत असतां तेथील स्त्रीपुरुषांसंबंधीं आपणास कोणते अनुभव आले व आपल्या देशांत आपण काय पाहिलें आपल्यांत उणीवा कोणत्या आहेत व त्या दूर कशा रीतीने करायच्या याचें सुंदर व उद्बोधक विवेचन महामानव स्वामी विवेकानंद यानीं या पत्रानें केलें आहे. पत्र थोडें मोठें असलें तरी बोलकें व आजही त्याचें महत्व फार आहे.

— संपादक

न्यूयॉर्क. २५ सप्टेंबर १८९४.

प्रिय—

तुमची कांहीं पत्रे येऊन मला आनंद झाला. एस्. हा मोठी गडबड उडवून देत आहे हें ठीक आहे. अशीच गडबड आपण उडवून दिली पाहिजे. त्याशिवाय आपला कार्यभाग होणार नाहीं. गुरुकृपेनें साऱ्या जगभर तुम्ही गडबड उडवून देणार आहां. '**श्रेयांसि बहुविघ्नानि**' हें तुम्हांला ठाऊक आहे. पुष्कळसे अडथळे उत्पन्न झाल्यानेंच मनुष्याच्या दानतींतले कोनेकोपरे आणि उंचवटे मोडून जाऊन ती सुघड होते. दानतीला दृढत्व येण्याचा मार्ग हाच आहे. आपल्या कार्यांत अडथळा आणण्याचें सामर्थ्य ख्रिस्ती भट आणि त्यांचे दुसरे बंधु यांना यत्किंचित् तरी आहे काय? मी मी म्हणविणाऱ्या महारथ्यांनीं जेथें हात टेकले तेथें असल्या बालवीरांचा काय पाड? अशांच्या धडपडीनें तुमचें यत्किंचितहि वांकडें होणार नाहीं, हें समजून आपलें मन स्वस्थ ठेवावें. कोणीं कसलाही यत्न सुरू केला कीं त्याला दोन जातीचे लोक भेटतात. कोणी त्याची स्तुति करतात, आणि दुसरे कोणी कावळ्यासारखे त्याला टोंचीत असतात. या दोहोंचीही उपेक्षा करून आपलें कार्य आपण चालू ठेवावें. कोणाशींही वादविवाद करण्याच्या अथवा कोणाला उत्तरें देण्याच्या भानगडींत पडूं नये. '**सत्यमेव जयते नानृतम् सत्यस्यैव पंथा विततो देवयानः ।**' सर्व गोष्टी योग्य काळीं आपोआप घडून येतात.

सध्या येथें उन्हाळा असल्यामुळे लोक समुद्रकांठीं जाऊं लागले आहेत. मीही कांहीं दिवस बाहेर गेलों होतों. बोटींत बसून समुद्रांत हिंडण्याचा नाद या लोकांना अतिशय आहे. हें एक खूळच होऊन बसलें आहे म्हणाना! लहान लहान हलकीं गलबतें येथें बांधतात. ज्याला थोडें बहुत सामर्थ्य आहे असा प्रत्येक मनुष्य बहुधा असलें गलबत घेतोच, आणि मग प्रत्येक दिवशी शीड सोडून सहकुटुंब समुद्रांत भटकत राहातो. संध्याकाळ झाली म्हणजे घरीं यावें आणि जेवणखाण करून नाचखान्यांत जावें, हा येथील लोकांचा धंदा आहे. गाणें बजावणें तर अहोरात्र चालूच असतें. बाजाच्या पेट्यांचा गोंगाट सुरू झाला कीं घरांत बसणेंही दुरापास्त.

## अमेरिकेंतील कौटुंबिक जीवन

येथें ज्यांच्या घरीं मी रहातों, त्या गृहस्थांची थोडीशी माहिती आतां सांगतों. हे गृहस्थ आणि त्यांची पत्नी हीं दोघेंही वृद्ध आहेत. त्यांना दोन मुली, एक मुलगा आणि दोन पुतण्या आहेत. मुलगा बाहेरगांवी असून तेथें आपला चरितार्थ तो चालवीत आहे. मुली घरींच असतात. कुटुंबाचें अस्तित्व येथें बहुधा मुलींवरच अवलंबून असतें. कारण, मुलानें लग्न केलें कीं तो तावडतोब वेगळा राहूं लागतो. पुढें कुटुंबाशीं त्याचा संबंध फारसा उरत नाहीं. पण मुलीनें लग्न केलें तर आपल्या पतीसह आपल्या आईबापांच्या भेटीला ती वारंवार येत असते. मुलगा हा घरांतला खरा; पण त्याचें पुत्रत्व त्याला बायको मिळेपर्यंतच असतें. पण मुलगी मात्र जन्मभर मुलगीच राहते, अशी येथें एक म्हण आहे. या घरांतल्या चारी मुली अद्यापि लहान असून अविवाहित आहेत. लग्न होणें हें सुध्दां येथें मोठें अवघड काम आहे. एक तर मनाजोगा नवरा मिळणें मोठें कठीण आणि तो पैसेवाला असणें हें त्याहून कठीण. श्रीमंत नवरा न मिळाला तर येथल्या मुली जन्मभर अविवाहित राहतात. आतां माझ्या संगतीनें या घरांतल्या मुलींना संन्यासधर्माची कल्पना येऊं लागली आहे. आजन्म नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळून ब्रह्माभिमुख व्हावें, असे विचार त्यांच्या डोक्यांत घोळूं लागले आहेत.

या चारी मुली अनेक प्रकारच्या कलांत प्रवीण आहेत. दोन पुतण्यांनीं लहान मुलांची एक शाळा चालविली असून तींत आपलें पोट त्या भागवितात; पण दोन मुली मात्र घरींच बसून असतात. या देशांतील पुष्कळ मुली आपा-

पला चरितार्थ स्वतंत्रपणें चालवीत असतात. कोणी कोणावर येथें अवलंबून असत नाहीं. लक्षाधीशांची मुलेंही आपापल्या पोटापुरतें मिळवीत असतात. लग्नें झालीं कीं आईबापांचे घर सोडून तीं वेगळी बिऱ्हाडे करितात. या घरातल्या मुली मला भाऊ अशी हांक मारतात; आणि मीही त्यांच्या आईला आईच म्हणतों. माझा सारा संसार त्यांच्याच घरीं असतो; आणि मी केव्हां इकडे तिकडे गेलों तर माझ्या वस्तू हीं माणसें नीट संभाळून ठेवतात. येथील मुलगे अगदीं लहानपणींच पोटाच्या मागें लागतात; आणि मुली विश्वविद्यालयांत व पाठशाळांत शिकत असतात. यामुळें सभा व्याख्यानादि प्रसंगीं नव्याण्णव टक्के भरणा मुलींचाच असतो. हें सहज तुमच्या लक्षांत येईल. अशा एखाद्या व्याख्यानाच्या वेळीं मुलगे आणि मुली यांची हजेरी पाहिली तर मुलगे 'दर्यामें खसखस.'

## भुताटकीचा खेळ

भुताटकीच्या मागें लागलेले लोक येथे पुष्कळ आहेत. झाडाच्या आंगी भूत आणून तें बोलविणें हा एक येथें खेळच आहे. हें झाड म्हणजे ज्याच्या अंगांत मृताचा संचार होतो तें मनुष्य. असें एखादें झाड एकाद्या पडद्यामागें बसवितात आणि मग त्यांत अनेक रंगाच्या आणि लहान मोठ्या भुतांचा संचार होतो. अशीं अंगांत आलेली माणसें मीं पुष्कळ पाहिलीं, पण मला तर तें सारें थोतांड दिसलें. पण यांत खऱ्या खोट्याचा पक्का निवाडा करण्यापूर्वी असले आणखी कांहीं प्रयोग मी पाहाणार आहें. बरेचसे पंचाक्षरी माझ्याविषयीं आदरबुद्धि बाळगणारे आहेत.

आतां याशिवाय आणखी एक वर्ग म्हटला म्हणजे तत्त्वदर्शी ख्रिस्त्यांचा होय. हे लोक जुन्या कर्मठांप्रमाणें अंधश्रद्धा बाळगणारे नव्हेत. अमेरिकेंत हा पंथ सध्या मोठा वजनदार होऊन बसला आहे. याचे अनुयायी जिकडे तिकडे आढळतात. याचा प्रसारही खूब झपाट्यानें होत आहे; आणि यामुळें जुन्या कर्मठ पंथाची मोठी त्रेधा उडाली आहे. हा पंथ आपल्या इकडील वेदांतासारखाच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. वेदांतांतलीं कांहीं तत्त्वें उचलून बायबलावर त्याचें कलम या पंथानें केलें आहे. **'सोऽहं सोऽहं'** असा जप करून ते आतां रोगसुद्धां बरे करूं लागले आहेत. या पंथाचे लोक मला फार चाहतात.

## पूर्वस्थितींत थारेपालट

या देशांतील पुराणा ख्रिस्ती धर्म मदतीची याचना करीत दारोदार फिरत आहे. आपण श्रेष्ठ आणि जगांतील बाकीचे लोक धर्मशून्य अशा वल्गना हे जुनाट ख्रिस्ती पूर्वीं करीत असत. पण ते दिवस कधींच स्मृतिशेष झाले. आपण देवाचे भक्त. आणि जग सैतानभक्त असें ते म्हणत असत. पण या स्थितीचा मागमूसही आतां राहिला नाहीं. मरणाच्या दारीं बसलेल्या या पंथाचे जे थोडे फार उपासक आहेत त्यांना मात्र मला पाहून संतापाचें भरतें येतें आणि त्यांनाच माझी भीतीही वाटते. ते म्हणतात, 'ही पीडा कोठून आली? हजारों स्त्रीपुरुषें याच्या मागें धावत सुटलीं आहेत. आमच्या जुन्या पंथाचीं पाळेंमुळें हा खणून टाकणारसें दिसतें.' काय सांगावें? मशाल लावण्याचें काम गुर्वाज्ञेनुरूप माझ्याकडे आलें तें मीं केलें; आणि धडाडून भडका उडाला. गुरूच्या आज्ञे-शिवाय हा विझला जाणें शक्य नाहीं. थोडक्याच काळांत या हठवादी कर्मठांचा निःपात होणार आहे.

थिऑसॉफीला येथें विशेषसा मान दिसत नाहीं. तथापि हा पंथही जुन्या कर्मठांवर हत्यार उगारतोच.

सध्याच्या काळीं येथें प्रबळ असलेला शास्त्रीय ख्रिस्ती पंथ जवळ जवळ आपल्या वेदांतासारखा आहे. 'मला रोग होत नाही' असें चिंतन केलें म्हणजे रोगहरण होतें. 'मला अमुक पाहिजे' या चिंतनानें हव्या त्या वस्तूची प्राप्ति होते असे म्हणणारा हा पंथ आहे. तथापि हा सारा देश मुळांत शुद्ध जडवा-द्यांचा आहे, हें विसरतां उपयोगी नाहीं. यामुळें '**सोऽहम्**' म्हणावें आणि मग मनास वाटेल तसें वर्तन करावें असेहि प्रकार येथें घडतात. यांची धर्माची व्याख्या सुद्धां ऐहिक स्वरूपाची आहे. जो रोग बरे करूं शकेल, चमत्कार घडवून आणील आणि कुबेराची तिजोरी उघडण्याच्या नानाप्रकारच्या युक्त्या दाखवील, तो धर्म. या व्याख्येशिवाय बाकीच्या गोष्टींचा धर्म त्यांना कळतच नाहीं. आतां याला कांहीं अपवाद आहेत हेंही खरें आहे.

## मानवी वंशाचा नवा नमुना

मी येथें आल्यापासून मानवी वंशाचा हा एक नवाच नमुना पहावयास सांपडला असें येथील लोक म्हणूं लागले, हा नमुना पाहून पुष्कळ लोक भांबावून गेले. या नमुन्याचा शेंडा बुडखा कोठें आहे हेंच प्रथम त्यांस समजेना.-

जुना पुराणा पंथही असाच भांबावून गेला होता. हळू हळू या लोकांची समजूत पटूं लागली; आणि माझें निरीक्षण करतां करतां माझ्याबद्दल त्यांना आदरभाव वाटूं लागला. ब्रह्मचर्य आणि पावित्र्य या वस्तूंचा प्रभाव अकुतोभय आहे.

मद्रासच्या लोकांनीं मला पाठविलेल्या मानपत्राला उत्तर तयार करण्याच्या कामांत मी सध्या गुंतलों आहें. हें मानपत्र येथल्या सर्व वर्तमानपत्रांत छापलें आहे; आणि त्यामुळें येथें बरीच धामधूम उडाली. याच्या कांही प्रती मी तुम्हांस पाठविणार आहें. माझ्या उत्तराच्याही प्रती तुम्हांस मिळतील. तें उत्तर तुम्ही इंडियन मिरर पत्रांत छापावें.

## अविवाहित मुली चौकस

येथील अविवाहित मुली फार चौकस असतात. पण दानतीनें व स्वभावानें त्या फार चांगल्या असून त्या स्वाभिमानीही आहेत. अमेरिकन लोक विरोचनाचे वंशज आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. देहपरिचर्या उत्तम चालणें हेंच मोठें पुण्य असें ते समजतात. देह सुंदर दिसण्यासाठीं साफसुफी आणि मख-लाशी करण्याचा नाद त्यांना अतिशय आहे. त्यांचें सारें लक्ष देहसौंदर्याकडे वेधलेलें असतें. नखें काढण्यासाठीं हजारो प्रकारचीं यंत्रें निर्माण झालीं आहेत, आणि केस कापण्याचीं यंत्रें दहा हजारांवर गणलीं पाहिजेत. यांची मोजदाद मीं कशीबशी केली; पण पोषाख, उटणीं, अर्गजे आणि सुगंधी तेलें यांची मोजदाद करण्यास कोण समर्थ आहे ? असो; असें असलें तरी हे लोक स्वभावानें खरोखरच चांगले, दयाळु आणि दिलाचे सच्चे असे आहेत. या दृष्टीनें हे चांगले आहेत; पण ऐहिक भोग हाच परमेश्वर ही कल्पना मात्र त्यांनीं सोडलेली नाहीं. नदीच्या ओघाखारखा पैशाचा प्रवाह येथें वाहतो. या प्रवाहावर सौंदर्यलहरी तळपत असतात. ऐहिक विद्वत्ता ही ह्या प्रवाहावरील मोठी लाट चैनींत ही लाट लोळत जाते.

'कांक्षंतः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः ।
क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥'

चिकाटी आणि दृढपणा हे दोन गुण येथल्यासारखे कोठें सांपडावयाचे नाहींत. हे लोक अत्यंत व्यवहारचतुर; व्यवहार चालविण्यासाठीं आपलें सारें सामर्थ्य ते खर्च करितात. यांचें पौरुषहि वाखाणण्याजोगें आहे. येथें सर्वच

वस्तूंचें प्रमाण जगांतल्यापेक्षां फार मोठें आहे. हत्तीसारखे प्रचंड घोडे राजमहाला-सारख्या गाड्या ओढतांना येथें आढळतील. प्रचंडपणाचा हा एक नमुना सांगितला, आणि हेंच प्रमाण येथें सर्वत्र लागू आहे. विश्वाची चालक शक्ति आपलें कार्य येथे मोठ्या प्रमाणावर करते.

## लक्ष्मी सरस्वति संगम

स्त्रियांना येथें मोठा मान आहे. साऱ्या व्यवहारांत स्त्रियांचें प्रस्थ फार. शक्ति-पूजेचा हा प्रकार येथें पूर्णावस्थेला पोंचला आहे. येथील स्त्रियांची मनोभूमिका कोणत्या अवस्थेची आहे, याची परीक्षा अद्यापिही मला झालेली नाहीं. मुला-सारखा मला हातीं धरून त्या मला सर्वत्र हिंडवितात. त्या मला बाजारांत घेऊन जातात अथवा एखादा अजबखाना दाखविण्यालाही त्याच मला घेऊन जातात. त्यांचें चापल्य आणि कार्यप्रवीणता विलक्षण आहे. त्या जितकीं कामें करितात त्यांचा सोळावा हिस्सा सुद्धां माझ्या हातून होत नाहीं. लक्ष्मी आणि सरस्वती यांचा संगम यांच्या ठिकाणीं दिसतो. ऐहिक प्रपंचांत पूर्णत्व पावण्यास शक्तिपूजेसारखें दुसरें साधन नाहीं हें उघड आहे; आणि येथील लोक हेंच करीत असतात. ऐहिक समाधानांत कां होईना हे लोक पुरुषार्थी आहेत. देवा ! देवा ! ! आम्ही हिंदु लोक माणसें तरी आहों काय ? येथील स्त्रियांसारख्या एक हजार स्त्रिया हिंदुस्थानांत माझ्या मरणापूर्वीं मी निर्माण करूं शकलों तर मी सुखानें मरेन. असें झालें तरच तुम्हीं हिंदु लोकांनीं आपल्या जुन्या मोठ्या नांवाचा बोज राखल्यासारखें होईल.

## स्त्रियांवर जगन्मातेची कृपा

येथील स्त्रिया पाहून मला खरोखरच मोठें नवल वाटलें. जगन्मातेची पूर्ण कृपा त्यांजवर आहेसें वाटतें. आतां सर्व प्रकारच्या व्यवहारांत स्त्रिया इतक्या झपाट्यानें पुढें सरसावत आहेत कीं, पुष्कळशा धंद्यांत उभे राहण्यापुरतीसुद्धां जागा पुरुषांस उरणार नाहींसें दिसतें, एकंदरीनें स्त्रीपुरुष हा भेदच येथें फारसा नाहीं; आणि वास्तविक पाहतां आत्म्याच्या ठिकाणीं तरी असा भेद कोठें आहे ? आपण सर्व आत्मवत् पाहूं लागलों म्हणजे हा भेद आपल्या डोक्यांतून पार नाहींसा होतो. 'मी देह' हाच भ्रम सर्व भेदाचें मूळ आहे. हा भ्रम सोडून देऊन उभे रहा; आणि सर्व एकच अस्तित्व आहे, हा धडा

आपल्या मनाला बढवीत चला. असे विधायक विचारच आपणांस आतां हितावह होणार आहेत. ' नास्ति नास्ति ' हा मंत्र युगानुयुगें आपण जपत राहिलों आणि आतां सारा देशच ' नास्ति ' होऊं पहात आहे. **' सोऽहं शिवोहं '** हा मंत्र आतां आपणांस हवा. प्रत्येक जीवात्म्यांस अनंत सामर्थ्य आहे आणि असें असतां **' नास्ति नास्ति '** म्हणून तुम्ही कुत्र्यामांजराच्या पंक्तीला गेलां ही केवढ्या कष्टाची गोष्ट ! मी दुबळा, मी दीन, असली हीन भाषा कां वापरतां ? **' शिवोहं '** असें म्हणा. नास्ति नास्ति या विचाराच्या मागें लागून सदा सुतकी झालेले लोक माझ्या नजरेस पडले म्हणजे माझ्या मस्तकावर गदाप्रहार होत आहे असें वाटतें. स्वतःची कांहींच किंमत न वाटणें हाही रोगाचाच एक प्रकार आहे. ही नम्रता नव्हे आणि हा विनयही नव्हे. विनयाचें सोंग घेतलेला हा दंभ आहे. **' लिंगं धर्मकारणम् । समता सर्वभूतेषु एतन्मुक्तस्य लक्षणम् ।। '** मुक्ताचीं लक्षणें हीं आहेत. **' चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् '** हा मंत्र आतां शिकून घ्या. हा मंत्र हृदयांत बाणला तरच जगजालापासून तुमची मुक्तता होणार आहे. **' नायमात्मा बलहीनेन लभ्यः '** ही श्रुति तुम्ही विसरलां काय ? आपलें सारें बळ एकवटून तुम्ही संसारावर हल्ला करा. शिवोऽहं या विचारानें तुमचें सामर्थ्य एवढें वाढलें पाहिजे कीं, तुमच्या तडाक्याखालीं जगाचे दोन तुकडे झाले पाहिजेत. ' हरहर महादेव ' म्हणून जगावर तुटून पडा. **' उद्धरेदात्मनात्मानं '** हा सिद्धांत त्रिकालाबाधित आहे. तुमच्या स्वतःशिवाय तुमचें हित करणारा कोणीहि नाहीं.

## खरा मोठा कोण ?

दुसऱ्याच्या हितासाठीं आपला जीव जाईल तर बरें असा विचार तुमच्या मनांत येईल तो सुदिन. जग म्हणजे कांहीं पोरखेळ नव्हे. तें नाचण्याबागडण्याचें आंगण नव्हे. **दुसऱ्यांना सुखानें चालत जातां यावें म्हणून स्वतःचें रक्त शिंपून जो कोंणी मार्ग तयार करतो, तोच खरा मोठा.** आज अनंत काल हाच प्रकार चालत आला आहे. एकजण आपल्या देहाचा पूल बांधतो आणि मग दुसरे हजारों त्याजवरून चालत जाऊन नदीपार होतात.

तुम्ही एक नवें वर्तमानपत्र सुरू करणार होतां असें ऐकिलें, त्याचें पुढें काय झालें ? कोणत्याहि विशिष्ट पंथाचा पक्षपात आपणांस करावयाचा नाहीं. कोणालाही तोडून न टाकतां सर्वांशींच मिळून मिसळून आपणांस काम करावयाचें आहे. शत्रूशीं लढतांना आपण सर्वच एकदिल झालें पाहिजे. आमच्या

गुरूवर लोकांची श्रद्धा असावी इतकीसुद्धां अपेक्षा आपण करूं नये. अर्धें हिंदी अर्धें बंगाली असें एखादें मासिक काढतां आल्यास पहा; आणि त्याबरोबरच एखादें इंग्लीश मासिक सुरू करितां आलें तर '**अधिकस्याधिकं फलं.**' उगीच इकडे तिकडे भटकत फिरण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जेथें जेथें तुम्ही जाल तेथें तेथें एकादा कार्यकारी मठ तुम्हीं स्थापला पाहिजे. तुमचें कार्य अशा रीतीनें सुरू झालें तरच लोकांचा विश्वास तुमच्यावर बसेल. सध्या एक ग्रंथ मी लिहीत आहें, तो पुरा झाला कीं मी घरीं धाव घेईन.

## रामकृष्णांचा अवतार जगाच्या कल्याणासाठी

भगवान् रामकृष्णांचा अवतार केवळ जगाच्या हितासाठीं होता हें केव्हांही विसरूं नका. कीर्तीच्या आणि मोठ्या नांवाच्या मागें ते कधींच लागले नाहींत. तेव्हां त्यांची कीर्ति पसरविण्याचा उद्योग तुम्हांला तरी कशाला हवा? त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करा. म्हणजे त्यांच्या मागें कीर्ति आपण होऊन चालून येईल. आपल्या गुरूचा स्वीकार लोकांनीं केला पाहिजे, असा हट्ट तुम्ही घेऊन बसलांत तर आणखी एका नव्या पंथाची भर पडण्यापलीकडे कांहीं होणार नाहीं. मग तुमचे सारे उच्च विचार गर्भावस्थेतच मरण पावतील. यासाठीं या पुढील भयापासून सावध रहा. आपण सर्वांशींच गोडीनें असावें. डोकें तापविण्यानें आपल्या कार्याचा हटकून नाश होतो. लोक कांहीं का बडबडेनात? तुम्ही आपल्या सिद्धांतांना चिकटून रहा. तुमची चिकाटी ढिली पडली नाहीं तर कधींना कधीं जग तुमच्या पायाशीं लोळण घेईल हें खचित समजा. अमुक मोठा म्हणून आज त्याच्या मागे जावें आणि दुसऱ्या दिवशीं दुसऱ्या एखाद्यास गुरुत्व द्यावें हें युक्त नव्हे. अशा धावण्यानें कोणताही कार्यभाग व्हावयाचा नाहीं. याच्यावर अथवा त्याच्यावर विश्वास टाकण्यापेक्षां स्वतःवरच विश्वास टाकण्यास शिका असें मी तुम्हांला सांगतों. खरा मार्ग हाच आहे. शक्तीचें केंद्र तुम्ही आम्हां, या वस्तुस्थितीची जाणीव करून घेणें आणि ती शक्ति उजेडांत आणणें एवढेंच तुमचें काम आहे. 'मी हवें तें करीन' हा विश्वास तुमच्या चित्तांत खरोखरच पक्का बाणला तर नागाचें विषहि तुम्हांस बाधणार नाहीं. सावध राहून नकाराचा नकार करण्यास तुम्हीं शिकलें पाहिजे. '**किं नाम रोदिषि सखे त्वयि सर्वशक्तिः। आमंत्रयस्व भगवन् न भगदं स्वरूपम्॥ त्रैलोक्यमेतदखिलं तव पादमूले। आत्मैव हि प्रभवते न जडः कदाचित्॥ १॥**'

( पुढील अंकी वाचा )

# शिरडीचें माहात्म्य

कवि : श्री. तु. नाईक

साईबाबांची माझ्या हो काय सांगू मात
साई बाबा माझे माय आणि तात ॥ धृ० ॥ ॥ १ ॥

शिरडींत वसे आतां माझा साईनाथ
दर्शनार्थ जमती तेथें भक्त दिन रात ॥ २ ॥

दीन दुबळ्यांची बाबा करतात साथ
अहोरात्र जळते जेथे समईत वात , ॥ ३ ॥

विसरून भयचिंता भक्त गात गीत
बाबा द्वारकामाईत निजती निवांत , ॥ ४ ॥

आहे परी भक्तांसाठीं चित्त ते अशान्त
ओसंडून आलें प्रेम उदंड नेत्रांत , ॥ ५ ॥

निंबाचिया झाडाखालीं वाहातें अमृत
नित्य बाबांच्या पेटतो ऊद धुनींत प्रशांत , ॥ ६ ॥

जाती पंथ विसरून चाले अध्यात्माची वाट
मुक्ति जोडोनीयां कर सदा लीन समाधींत , ॥ ७ ॥

येथे अंकुरलें बीज गोदामाईच्या कुशींत
कसें बहरून आलें पहा अध्यात्माचें शेत , ॥ ८ ॥

नित्य चालतें भजन हरिनाम राउळांत
बाबा ऐकती पहाती आरतीचा नवा थाट , ॥ ९ ॥

सर्वधर्मी समानत्व इथें नांदे शिरडींत
तेज उफाळून येतें झोपलेल्या समाधींत , ॥ १० ॥

मन माझें तेजाळलें साईबाबा-सान्निध्यांत
शिरडीसारखें स्थळ नाहीं देखिलें स्वप्नांत , ॥ ११ ॥

# शिरडी-वृत्त

## जुलै-१९७०

या महिन्यात श्री साईबाबांचे दर्शनार्थ पंढरपूर यात्रेस जाणारे व पंढरपुराहून येणारे अशा भक्तांची फारच गर्दी झाली होती. शिवाय श्री गुरुपौर्णिमाउत्सवही या महिन्यांत आल्यानें- उत्सवास येणारांची गर्दी होती. कांहीं कलाकारानीं श्रीपुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणें:—

**कीर्तन—**

श्री. ह. भ. प. गजानन शास्त्री जोशी कोपरगांव

श्री. ह. भ. प. गोपाळराव पारखी सातारा.

श्री. ह. भ. प. माधवराव वालावलकर मुंबई.

श्री. ह. भ. प. बाबुराव नरोडे कोपरगांव

या शिवाय आषाढ शु. ११ संस्थानगवई मराठे व श्री नामदेव पुण्यतिथी निमित्त श्री. द. दा. रासनें नानासाहेब यानी कीर्तन केलें.

**गायन भजन**

श्री. डुंगाजी लक्ष्मण गोरे मु. वैजापूर

श्री. धर्म जागृत सेवा भजनी मंडळ कोळीवाडा वसई

श्री. घुमरे ब्राम्हण वाडा भजनी मंडळी मु. पो निफाड. जि. नासिक

आषाढ शु॥ ११ महाएकादशी निमित्त श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक, गारुड भारुड व कीर्तन असे कार्यक्रम झाले.

**माननियांच्या भेटी**

१ ) दि १०।७।७० नामदार पी. के. सावंत कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य

२ ) दि २९।७।७० मा. हेगडे साहेब सुप्रीम कोर्ट जज्ज, दिल्ली

शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं; पाऊस विशेष नाहीं.

---

## मुंडकोपनिषद आणि विज्ञान

**शाहीर श्री. पां. द. खाडिलकर यांच्या या लेखमालेंतील दुसरा लेखांक पुढील अंकीं.**

—संपादक

**Books published and sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फें प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ( १ ) | **श्रीसाईसच्चरित्र** | ( मराठी ) | श्री. दाभोळकरकृत | ८–०० |
| ( २ ) | ,, | ( हिंदी ) | श्री. ठाकूर | ५–५० |
| ( ३ ) | ,, | ( गुजराथी ) | श्री. सोमपुरा | — |
| ( ४ ) | ,, | ( इंग्रजी ) | Shri Gunaji | ५–२५ |
| ( ५ ) | ,, | ( Kannad ) | N. S. Anantha Raum | ६–०० |
| ( ६ ) | **A Glimpse of Indian Spirituality**–by Pradhan | | | १–५० |
| ( ७ ) | **A Glimpse of Indian Spirituality** ( Telugu ) | | | १–०० |
| ( ८ ) | **श्रीसाईलीलामृत** | ( मराठी ) | श्री. आगास्करकृत | २–७५ |
| ( ९ ) | **साईबाबा–अवतार व कार्य** | ( मराठी ) | श्री. धोंड | २–०० |
| ( १० ) | **साईबाबांचे ४ अध्याय** | ( मराठी ) | श्री. दासगणू | ००–५० |
| ( ११ ) | **सगुणोपासना** | ( मराठी ) | श्री. भीष्म | ००–२५ |
| ( १२ ) | ,, | ( गुजराथी लिपींत ) | श्री. भीष्म | ००–२५ |
| ( १३ ) | **श्रीरुद्राध्याय ११ वा** | ( मराठी ) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| ( १४ ) | **शीलधी** | ( मराठी ) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| ( १५ ) | **श्रीसाईगीतांजलि** | ( मराठी ) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| ( १६ ) | **Guide to Shirdi** ( English ) | | | ००–१२ |
| ( १७ ) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | ( मराठी ) | | ००–२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 P. and 50 P. for No. 1. Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* :

1. **Receiver Shri Sai Baba Sansthan,**
   P. O. Shirdi., Dist. Ahmednagar.

2. **Sai Baba Office ' Sai Niketan,'**
   Dr. Ambedkar Road, 804 B, Dadar, Bombay 14.